cmyk



दैनिक
# राज्य लोकतंत्र

गणपती बाप्पा मोरया

www.epaper.rajyaloktantra.com  नवी दिशा... नवे विचार.....  email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१४५ | रविवार दि.१५ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांच्या सोयाबीनला मिळणार चांगला भाव!

## केंद्राने सोयाबीनच्या हमीभावासोबतच खाद्यतेलावरील आयात शुल्कही वाढवले; कृषि मंत्री धनंजय मुंडे यांनी मानले केंद्र सरकारचे आभार

**मुंबई । प्रतिनिधी**

**सोयाबीनची ९० दिवसांनी हमीभावाने खरेदी करण्याच्या निर्णयापाठोपाठच केंद्र सरकारने खाद्य तेलावरील आयात शुल्क २० टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीनला चांगला भाव मिळेल असा विश्वास कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला असून या निर्णयाबद्दल त्यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.**





राज्यात सोयाबीनचा पेरा ५२ लाख हेक्टर पेक्षा जास्त झाला असल्याने तसेच यावर्षी पाऊस पाणी व्यवस्थित झाले असल्याने सोयाबीनचे उत्पन्न बंपर होणार आहे. अशावेळी शेतकऱ्यांच्या सोयाबीनला योग्य भाव मिळावा यासाठी कृषी मंत्री धनंजय मुंडे हे सातत्याने प्रयत्न करीत असून, त्या दृष्टिकोनातून त्यांनी केंद्र शासनाकडे सोयाबीनची हमीभावाने खरेदी करावी. खाद्यतेल, सोया मिल्क, सोया केक इत्यादी उत्पादने आयात करण्यास शुल्क ◀◀ पान २ वर

### यापूर्वी एवढे होते आयात शुल्क

कच्च्या खाद्यतेलावर पूर्वी ५.५% आयात शुल्क होते ते आता २७.५% असेल तर रिफाइंड तेलावरील आयात शुल्क पूर्वीच्या १३.७५ टक्क्यावरून आता ३५.७५ टक्के इतके वाढवण्यात आले आहे.

## आता १० नोव्हेंबर रोजी होणार ‘टीईटी’ परीक्षा

### शिक्षकांची २४ हजार पदे भरणार



**पुणे । प्रतिनिधी**

**शिक्षक भरतीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. शिक्षक भरतीसाठी घेण्यात येणारी टीईटी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा १० नोव्हेंबर रोजी घेण्यात येणार आहे. यावेळी या परीक्षेची जबाबदारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेवर सोपवण्यात आली आहे.**

टीईटी परीक्षेमध्ये गैरप्रकार झाल्याचे प्रकरण गेल्यावर्षी उघडकीस आले होते. त्या पार्श्वभूमीवर टीईटी २०२४ चे काय होणार, याबद्दल साशंकता होती. आता जाहिरात प्रसिद्ध झाल्यामुळे यंदाच्या शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य परीक्षा परिषदेच्या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरण्याच्या सुविधेसह परीक्षेबाबतचा संपूर्ण तपशील उपलब्ध आहे. राज्यात शिक्षकांची २४ हजार पदे भरण्यात येणार असून, तशी घोषणाही झाली आहे. शिक्षक भरतीची प्रक्रिया रखडली आहे. त्याविरोधात राज्यातील डी.एड., बी.एड.धारक उमेदवारांनी पुण्यात बेमुदत उपोषण केले होते. शिक्षक भरतीसाठी आवश्यक असलेली बिंदुनामावलीची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यासाठी शिक्षण विभाग जबाबदार असल्याचे उमेदवारांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर ◀◀ पान २ वर

# होय,मी मध्यरात्री २.३० वाजता अंतरवालीत गेलो, जरांगेंना भेटलो

# वादाची ठिणगी: रोहित पवारांचे छगन भुजबळांना खुले चॅलेंज





**मुंबई । प्रतिनिधी**

**अंतरवाली सराटीत मराठा आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली होती तेव्हा मनोज जरांगे पाटील तिथून निघून गेला होता, त्यानंतर रात्री दोन वाजता रोहित पवार आणि आ. राजेश टोपे हे अंतरवाली सराटीतील उपोषणस्थळी आले आणि त्यांनी मनोज जरांगे यांना पुन्हा त्याठिकाणी बसवले, असा दावा छगन भुजबळ यांनी केला होता. आता, भुजबळ यांच्या दाव्यावर रोहित पवार यांनी पलटवार केला आहे. अमानुष लाठीचार्ज केल्याने त्या भागात नागरिकांमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण होते, त्यामुळे मी स्वतः रात्री अडीच वाजता जाऊन त्या भागातील हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमींची विचारपूस केली, धीर दिला. जरांगे पाटील यांच्या कुटुंबाला धीर दिला, यात चुकीचे काय आहे का?, असा सवाल रोहित पवार यांनी दिला आहे. तसेच, आपण मध्यरात्री २.३० वाजता तेथे गेलो होतो, असेही त्यांनी मान्य केले.**

राज्यातील मराठा आरक्षणाचा लढा अद्यापही सुरू असून मनोज जरांगे पाटील यांनी १७ सप्टेंबरपासून पुन्हा एकदा ते उपोषणाला बसत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापताना दिसून येते. मनोज जरांगे यांच्या उपोषणाच्या स्थळीच आपणही उपोषण करणार ◀◀ पान २ वर

### मराठा आंदोलकांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना आडवले

धाराशिव– मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जिल्ह्यात आलेल्या प्रत्येक नेत्याला घेराव घालत मराठा आरक्षणाची मागणी रेटण्याची मराठा आंदोलकांची पद्धत आजही कायम राहिली असून धाराशिवच्या परंड्यात आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही मराठा आंदोलकांनी अडवल्याचे दिसून आले. धाराशिवच्या हातलाई मंगल कार्यालयात पक्षमेळाव्यासाठी मुख्यमंत्री आले असता मराठा आंदोलकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसमोर घोषणाबाजी केली. यावेळी आंदोलकांनी हैद्राबाद गॅझेट लागू करण्याची मागणी केली.

## सगेसोयरेचा कायदा २०१७ साली देवेंद्रजींनी लागू केला

### ■ मंत्री चंद्रकांत पाटलांचा बार्शीतून दावा

सोलापूर : मराठा समाजाला ओसीबीतून आरक्षण मिळण्याच्या मागणीसाठी आंदोलनास बसलेल्या बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांच्या आंदोलनस्थळी जिल्ह्याचे पालकमंत्री आणि भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी भेट दिली. ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीला कोणा–कोणाचा पाठिंबा आहे, हे लक्षात येईल, दूध का दूध, पाणी का पाणी होईल, असे म्हणत राऊत यांनी विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी केली आहे. गेल्या ३ दिवसांपासून त्यांचे ठिय्या आंदोलन सुरू असून आज चंद्रकात पाटील यांनी भेट देऊन त्यांची भूमिका ऐकून निवेदन स्वीकारले. त्यानंतर, माध्यमांशी बोलताना सगेसोयरेची व्याख्या सांगितली. तसेच, देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना त्यांनी सगेसोयऱ्याच्या अधिसूचनेबाबत रक्त संबंधाचा कायदा केल्याची माहिती पाटील यांनी दिले.





मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीसह सगेसोयरे अधिसूचनेची मागणीही मनोज जरांगे पाटील यांच्याकडून सातत्याने होत आहे. त्यावर, चंद्रकांत पाटील यांनी भाष्य केले.

### हैद्राबाद गॅझेट लागू करावे–राऊत

■ हैद्राबाद गॅझेट लागू करावे ही मगणी असून विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावावे, यासाठी मी अध्यक्षना पत्र लिहले आहे. त्यामुळे, पालकमंत्री म्हणून आम्ही आमची मागणी तुमच्याकडे पोहोचवत आहोत, त्याबाबत तुम्ही आम्हाला आश्वासित करावे, असेही आमदार राजेंद्र राऊत यांनी यावेळी म्हटले.

### काय म्हणाले होते छगन भुजबळ

■ नाशिक येथे पत्रकारांशी बोलताना छगन भुजबळ यांनी अंतरवाली सराटीतील दगडफेक आणि लाठीमाराच्या घटनेबाबत भाष्य केले. त्यांनी म्हटले की, माझ्या माहितीप्रमाणे अंतरवालीत ज्यावेळी दगडफेक झाली आणि त्यानंतर लाठीमार झाला तेव्हा मनोज जरांगे तिथून निघून गेला होता. परंतु, रात्री दोन वाजता रोहित पवार आणि राजेश टोपे यांनी मनोज जरांगे यांना पुन्हा तिकडे आणून बसवले. यानंतर तिकडे शरद पवार गेले, मग उद्धव ठाकरे हेदेखील तिकडे गेले. पवार आणि उद्धव साहेबांना पोलिसांवर दगडफेक झाल्याची कल्पना नव्हती. आंदोलकांच्या दगडफेकीत ८० पोलीस कर्मचारी जखमी झाले होते. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. त्यांनी अंतरवाली सराटीत स्वसंरक्षणासाठी लाठीमार केला, हे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना माहिती नसल्याचे छगन भुजबळ यांनी म्हटले.

## जायकवाडीमधून विसर्ग थांबविला

संभाजीनगर: तुडुंब होण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या जायकवाडी प्रकल्पाचे उघडलेले १८ दरवाजे टप्प्याटप्प्याने शुक्रवारी (ता. १३) सकाळपर्यंत पूर्णतः बंद करण्यात आले. त्याच वेळी उजव्या कालव्यातून माजलगाव प्रकल्पासाठी मात्र १४६८ क्युसेकने पाणी सोडले जात होते. जायकवाडी ◀◀ पान २ वर

## तीन घराणेशाहीने काश्मीरला उद्ध्वस्त केले–नरेंद्र मोदी



**डोडा । वृत्तसंस्था**

**जम्मू–काश्मीरला काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीच्या घराणेशाहीने उद्ध्वस्त केले आहे. या तिन्ही कुटुंबांनी मिळून तुमच्यावर जो अन्याय केला आहे, तो पापापेक्षा कमी नाही. अनेक दशकांपासून जम्मू–काश्मीरच्या बरबादीला तिन्ही कुटुंबे जबाबदार आहेत, असा घणाघाती हल्ला पंतप्रधान मोदी यांनी चढवला. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी मोदी यांची शनिवारी (दि. १४) डोडा येथे रॅली काढण्यात आली. त्यानंतर ते सभेत बोलत होते.**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आम्ही आणि तुम्ही मिळून सुरक्षित काश्मीर निर्माण करू, ही मोदींची गॅरंटी आहे. जम्मू–काश्मीरच्या निवडणुका भविष्याचा फैसला ठरविणाऱ्या आहेत. एका बाजूला काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीचे राजकीय कुटुंबे आहे. तर दुसऱ्या बाजूला स्वप्ने घेऊन निघालेली तरुण पिढी आहे. या तीन कुटुंबांनी भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्याचे काम केले. तसेच जमीन हडप करणाऱ्या टोळ्यांना फूस दिली. सोयीसुविधांपासून तुम्हाला वंचित ठेवले. या तिन्ही कुटुंबातील लोकांनाच सरकारी नोकऱ्या देण्यात ◀◀ पान २ वर

## मुख्यमंत्री योजनादूतसाठी मुदतवाढ, १७ सप्टेंबरपर्यंत करता येणार अर्ज

### ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड, दहा हजार असणार महिना

**मुंबई । प्रतिनिधी**

**शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून, आता १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक



ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी ◀◀ पान २ वर

## ईद–ए–मिलादची सुट्टी १६ ऐवजी १८ सप्टेंबर रोजी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या २४ सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये ईद–ए–मिलाद या सणाची सुट्टी सोमवार, १६ सप्टेंबर, २०२४ रोजी दर्शविण्यात आलेली आहे. ईद–ए–मिलाद हा मुस्लिम धर्मियांचा सण मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात साजरा करत असतात. यावेळी जुलूस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. मंगळवार १७ सप्टेंबर, २०२४ रोजी अनंत चतुर्दशी हा हिंदूचा सण असल्याने दोन्ही समाजामध्ये शांतता व सामाजिक सलोखा कायम राहण्याच्या हेतूने यावर्षी मुंबई शहर, मुंबई उपनगर व इतर काही जिल्ह्यांमध्ये मुस्लिम धर्मियांनी बुधवार, १८ सप्टेंबर, २०२४ रोजी जुलूस काढण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे, मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यात सोमवार, ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१४ सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :१.०० क्विंटल | २,६३३ | २,६७१ | २,६५२ |
| ज्वारी/हायब्रिड : ६४.०० क्विंटल | २,०५१ | २,८११ | २,३१० |
| मूग : ४८.५० क्विंटल | ६,१०१ | ८,००० | ७,२४७ |
| तूर : १.०० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : १६२.५० क्विंटल | ४,८०० | ७,२६० | ६,२४३ |
| बाजरी : २७.५० क्विंटल | २,३४० | ३,८७० | २,८५६ |
| मुग : २९.५० क्विंटल | ५,२०१ | ७,७०० | ७,१७९ |
| सोयाबीन:२३९.५० क्विंटल | ४,५०० | ४,७०० | ४,६५० |
| हरभरा: ६.०० क्विंटल | ६,४५० | ७,८९१ | ७,१६२ |

# साखर कारखान्यांना दिलासा...

## उसाचा रस, बी हेवी मोलॅसिसपासून अल्कोहोल निर्मीतीला परवानगी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

केंद्र सरकारकडून देशात साखरेचा पुरवठा कमी पडू नये यासाठी १५ डिसेंबर २०२३ रोजी एका आदेशाद्वारे उसाचा रस आणि बी हेवी मोलॅसिसपासून रेक्टिफाईड स्पिरिट, इथेनॉल आणि एक्स्ट्रा न्यूट्रल अल्कोहोल निर्मितीवर बंदी घातली होती. दरम्यान इथेनॉल निर्मिती वरील बंदी मागच्या १५ दिवसांपूर्वी केंद्राकडून उठवण्यात आली. यानंतर केंद्र सरकारने उसाचा रस आणि बी



हेवी वे मोलॅसिसपासून अल्कोहोल निर्मितीवरील बंदी २०२४–२५ च्या गळीत हंगामासाठी उठवली आहे. साखर कारखान्यांना उपपदार्थांच्या निर्मीतीसाठी मार्ग मोकळा झाल्याने साखर कारखानदारीसाठी हा दिलासादायक निर्णय मानला जात आहे.

अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाने साखर कारखान्यांना उसाचा रस आणि बी–हेवी मोलॅसिस पासून रेक्टिफाइड स्पिरिट, एक्स्ट्रा न्यूट्रल अल्कोहोल तयार करण्याची परवानगी दिली आहे. इथेनॉलवरील बंदी उठवल्यानंतर यंदाच्या गळीत हंगामात अल्कोहोल आणि रेक्टिफाईड स्पिरीटवरील बंदी उठवण्याची मागणी साखर उद्योगातील अनेक जाणाकारांनी मागणी केली होती. यावर ◀◀ पान २ वर

### साखरेचा विक्री दर वाढविण्याची मागणी

साखरेचा विक्री दर वाढवावा तो दर ३१०० रुपये प्रतिक्विंटल आहे. तो वाढवून ४२०० रुपये करावा अशी मागणी साखर कारखानदारांकडून गेल्या दोन–तीन वर्षापासून होत आहे. केंद्र सरकारने ही मागणी अद्याप पूर्ण केलेली नाही. साखरेचा विक्री दर वाढल्यास साखर कारखान्यांना आर्थिक अडचणीतून बाहेर पडण्यास मदत होणार आहे.

cmyk

अग्रलेख

# सत्तेच्या चाव्या पवारांकडेच असतील !

भाजपा आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना अडचणीत येईल. महाराष्ट्रातील मतदार या दोन पक्षांना धक्का देतील असा आणखी एक सर्वे पुढे आला आहे. या सर्वेत एकनाथ शिंदे यांची शिवसेना, शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि काँग्रेस उत्तम यश मिळवेल असे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. अजित पवार यांना राज्यात दोन अंकी यश मिळवणे अवघड जाईल असे हा सर्वे सांगतो. एकुणच युतीला दणका आणि महाआघाडीची सरशी असा अंदाज काढण्यात आला आहे. महाआघाडी बहुमत मिळवेल आणि काँग्रेस मोठा भाऊ असेल व राहुल गांधी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री निश्चित करतील असे ढोबळ चित्र समोर आले आहे. या सर्वेत कोकणात थोडीफार युती बऱ्या जागा घेईल पण विदर्भ, मराठवाडा, मुंबई, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र अशा सर्व विभागात भाजप महायुतीला दणका बसेल असे दिसते आहे.

आघाडीत काँग्रेस मोठा भाऊ असणार हे दिसते आहे पण चेहरा कोण असणार हे पक्के नाही. कुणाला वाटते पृथ्वीराज चव्हाण, कुणाला वाटते बाळासाहेब थोरात, कुणाला वाटते विश्वजीत कदम तर काहींना वाटते वर्षा गायकवाड. ओघानेच चेहरा निश्चित झालेला नाही आणि काँग्रेस शेवटच्या क्षणापर्यंत तो जाहीर करणार नाही. मात्र काँग्रेस कमबॅक करते आहे असा हा आणि असे जाहीर झालेले दोन चार सर्वे सांगत आहेत. सर्वे म्हणजे निकाल नव्हे ती शितावरून भाताची परीक्षा असते ती तंतोतंत होते असे नाही. लोकसभा व अनेकवेळा असे सर्वे तोंडावर पडले आहेत. यावेळी काय होते ते बघायचे पण महाराष्ट्रात रोज वेगळी हवा वाहत असते.

बदलापूर घटनेमुळे महायुतीला जोरदार धक्का बसला. जोडेमारपर्यंत हे प्रकरण गेले. त्या नंतर सिंधुदुर्ग पुतळा प्रकरणाच्या घटनेमुळे तर चक्क पंतप्रधानांना माफी मागावी लागली. लाडकी बहीण, लाडका भाऊ अशा रेवड्या वाटून काही जमवण्यासाठी पाऊले टाकलीच होती. त्यातून श्रेयवादाचे नाटक सुरु झाले, अजितदादानी स्वतंत्र मेळावे घेतले. योजनेच्या नावातून मुख्यमंत्री शब्द वगळला. त्यामुळे महायुतीत संघर्ष झाला. अजितदादांचे बोलण्यात बोलणे नाही. त्यांच्या बोलण्यामुळे ते महायुतीत राहतात का? बारामतीची जागा लढवणार का? पवार कुटुंबियांचे नेमके काय सुरू आहे? असे अनेक सवाल सुरू आहेत. शरद पवार यांच्या मनात काय आहे. कोणता चेहरा आहे याचा कोणताही अंदाज नाही. मध्यंतरी त्यांनी भाजप विरोधी छोट्या पक्षांनी काँग्रेसमध्ये विलीन व्हावे असे विधान केले होते. शरद पवार बोलतात, त्यामागे त्यांचा हेतू वेगळा असतो. ते बंदूक एकावर रोखतात आणि गोळी दुसऱ्याला मारतात, ते बारामतीला जाणार म्हणून घोषणा करतात आणि कागलला पोहचतात. ओघाने त्यांचा थांग कोणालाच लागत नाही. निवडणूक व्यूहरचनाकार प्रशांत किशोर यांनी मध्यंतरी राष्ट्रवादीसाठी काम करावे यासाठी पावले टाकण्यात आली होती. पण त्यांनाही पवार कळले नाहीत. पवारांच्या मनात काय आहे त्यांना कोणता चेहरा हवा आहे याचा कोणालाच अंदाज नाही पण ते देवेंद्र फडणवीस यांना धक्का देणार, उद्धव ठाकरे यांना पुन्हा संधी देणार नाहीत, हे स्पष्ट आहे. एकेकाळची त्यांना घायाळ करून सत्ता वंचित करणारी भाजप - सेना युती त्यांना सलती असे दिसते आहे. त्यामुळेच या निवडणुकीत भाजप, उद्धव ठाकरे शिवसेना अडचणीत आहे. मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीस यांना केलेले लक्ष हे कुणी काही म्हणो त्यामागे जे अदृश्य हात आहेत ते जगजाहीर आहेत. ओघानेच निवडणुकीच्या आणि त्यानंतरच्या सत्तेच्या चाव्या आपल्याकडे ठेवणार हे उघड आहे, मोठा भाऊ कुणी असो. राज्याभिषेक कुणाचा करायचा हे ठरवण्याची शक्ती आपल्याकडे असली पाहिजे अशी त्यांची पावले पडत आहेत.

महायुतीला अनेक रेवड्या वाटूनही यशाची खात्री वाटत नाही. त्यामागे भाजपाचे कचखाऊ धोरण आणि सत्तेसाठी स्वप्रतिमा हनन ही कारणे आहेत. शेतकऱ्यांना पिकमालाला उत्तम भाव आणि नैसर्गिक आपत्तीत तात्काळ मदत मिळत नाही हे दु:ख आहे. फोडाफोडीचे राजकारण व पातळी सोडून होणारी टिका टिपणी यालाही महाराष्ट्र कंटाळला आहे. यावेळी जातीच्या पेट्या नाचल्या नाहीत तर मतदान अत्यल्प होईल अशी जाणकारांची भविष्यवाणी आहे. पण मराठा, ओबीसी, मागास, इतरमागास, मुस्लिम अशा मतपेट्या जाग्या केल्या जात आहेत, त्यांची मोळी कोण बांधणार हे बघावे लागेल पण शरद पवारांचा अंदाज कुणालाच नाही. काँग्रेसमध्ये छोट्या पक्षांनी विलीन व्हावे ही शरद पवारांची सुचना कोणता पक्ष अंमलात आणतो हे बघायचे पण काहीही होऊ शकते. निवडणुकीची अद्याप घोषणा नाही पण महिना अखेरीस ती अपेक्षित आहे. महाराष्ट्र प्रस्थापित राजकारणाला व नेत्यांना कंटाळला आहे. राज्याला नवा चेहरा आणि महाराष्ट्र सर्वार्थाने समर्थ करणारे नेतृत्व हवे आहे पण तसे कुणी पुढे येत नाही. राजकारणाच्या चिखलात व जाती पातीच्या खुज्या खांद्यावर बंदुका उंचावणारे जातदांडगे, धनदांडगे दुर्दैवाने पुढे आहेत. त्यामुळे मतदारांना चांगले पर्याय पुढे येताना दिसत नाहीत.


तूर्त जे सर्वे जाहीर झालेत त्यांच्यानुसार महाआघाडी पुढे आहे, महायुती मागे पडली आहे, भाजप, शिवसेना ठाकरे गट व राष्ट्रवादी अजित पवार गट बॅकफुटवर दिसतो आहे. काँग्रेस सर्वात मोठा पक्ष आणि शिवसेना एकनाथ शिंदे गट द्वितीय क्रमांकावरचा पक्ष राहील असे तर्क आहेत. राज्यात शेतकरी, युवक, छोटे उद्योजक, मुस्लिम मतपेटी अस्वस्थ आहे. अजून निवडणूका ज़ाहीर नाहीत. पक्षपंधरवड्यानंतर निवडणूक घोषणा होईल तेव्हा कसे वारे वाहते, मुद्दा कोणता होतो व लाभ कोण उचलतो हे बघावे लागेल पण मतदार निवडून देतील तेच सरकार सत्तारुढ होईल असे नाही, निवडून आलेले सहा सात पक्षांचे आमदार कशा टोळ्या करतील, पुन्हा नवी मोट कशी बांधतील, यावरच पुढचा खेळ असेल हे मात्र पक्के आहे.

# बीडच्या गजानन बँकेचे पुढचे पाऊल लवकरच; वडवणी शाखेचाही शुभारंभ होणार

## माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेची प्रगती

**बीड । प्रतिनिधी**

**स्व.माजी खा.केशरकाकू क्षीरसागर यांनी स्थापन केलेल्या आणि माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर अध्यक्ष असलेल्या श्री गजानन नागरी सहकारी बँकेने पुढचे पाऊल टाकले आहे. २९ वर्षाची यशस्वी वाटचाल करणार्या या बँकेच्या शाखा विस्तारात दहा शाखांचे काम सध्या यशस्वीपणे चालू आहे. आता जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी देखील बँक शाखेला मागणी येऊ लागली आहे. गेल्या काही महिन्यापूर्वीच छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी शाखेचा शुभारंभ झाला होता.आता वडवणी शहरात जागा निश्चित करण्यात आली असून लवकरच दीपावलीच्या आसपास या शाखेचा शुभारंभ होणार आहे.**



बीड येथील सहकार क्षेत्रात नावाजलेली बँक म्हणून श्री गजानन नागरी सहकारी बँक आहे. या बँकेच्या शाखा विस्ताराचा शुभारंभ होऊ लागला आहे. ग्राहकांना विविध सेवा आणि रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार बँकेचा सुरू असलेला कारभार तसेच अध्यक्ष असलेले माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली बँकेची वाटचाल सुरू आहे. या बँकेचा शाखा विस्तार करत असताना बीड जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणाहूनही शाखेची मागणी येऊ लागली आहे.शुक्रवार दि.१३ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत वडवणी येथे शाखा सुरू करण्याबाबतचा निर्णय झाला असून वडवणी शहरात जागा निश्चित करण्यात आली असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. बँकेच्या अधिकार्यांनी आणि संचालक मंडळाने उत्तमरीत्या कारभार करत बँक प्रगतीपथावर नेली आहे. यावर्षी बँकेने १०२.६७ लाख नफा मिळवला आहे, बचत खाते,चालू खाते,सोने तारण कर्ज, गृह कर्ज, व्यापारी कर्ज, मुदत ठेव, वाहन कर्ज, वैयक्तिक व पगार कर्ज, लॉकर सुविधा अशा सेवा उपलब्ध करून देत बँकेने ग्राहकांना पाच लाखाचे विमा कवच देखील दिले असून केशर ठेव योजनेअंतर्गत ही सुविधा उपलब्ध आहे,बँकेने ऑडिट वर्ग अ ठेवत सभासदांना लाभांश देत पंतप्रधान सुरक्षा विमा योजना, तात्काळ व सुलभ कर्ज प्रक्रिया, संगणकीकृत सीबीएस प्रणाली, आकर्षक ठेव योजना, डिजिटल सेवा आणि केंद्र व राज्य शासनाच्या योजना ज्यामध्ये सबसिडी, पेन्शन, स्कॉलरशिप आदि सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात येतात. भारतीय रिझर्व बँकेच्या सर्व निकषांची सातत्यपूर्ण पूर्ततेची परंपरा राखणारी ही बँक आता आणखी पुढचे पाऊल टाकत असल्याची माहिती बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी एम.आर.क्षीरसागर, सरव्यवस्थापक डॉ. एम.एस.शेख, व्यवस्थापक विलास कुंबेफळकर यांनी दिली आहे.

# आष्टीतील खडकत चौक गणेश मंडळाने केली महिलांच्या हस्ते आरती, स्तूत्य उपक्रम



**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी शहरातील खडकत चौक गणेश मंडळ दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री गणेशोत्सव विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात येत आहे. यंदाच्या गणेशोत्सवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे शहरातील विविध क्षेत्रातील महिला मंडळाच्या हस्ते शुक्रवार दि १३ सप्टेंबर रोजी संध्याकाळी सात वाजता महाआरती करण्यात आली.**

आष्टी शहरातील खडकत चौक गणेश मंडळ गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवून व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात येते त्या अनुषंगाने महिलांच्या हस्ते आरतीचे आयोजन करण्यात आले होते. या आरतीचा मान डॉ वर्षा राऊत, जिजाऊ ब्रिगेडच्या शहराध्यक्षा विद्या चव्हाण, डॉ पल्लवी सानप,शितल तांगडे,स्मिता सहस्त्रबुद्धे,रेखा कदम,अश्विनी हेळकर,पुजा धोंडे आदी महिलांच्या हस्ते गणपतींचे पूजन करून त्यानंतर श्री गणेशमूर्तीची महाआरती झाली.यावेळी मंडळाने महिलांना आरतीचा मान दिल्याबद्दल महिलांनी मंडळाचे आभार मानले.यावेळी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



# वारकरी संप्रदायाकडून समाज घडविण्याचे कार्य-आ.लोणीकर

जालना । प्रतिनिधी

वारकरी संप्रदाय हा वारकरी पंथाला आपले संपूर्ण जीवन अर्पण करणारा; राज्याला, देशाला समाज प्रबोधनाची दिशा देणारा, चुकले माकल्यांना सन्मार्गाची दिशा देणारा असून समाज घडविण्याचे काम वारकरी संप्रदाय करत असतो. महाराष्ट्र ही संतांची भूमी असून मोठी संत परंपरा आपल्याला लाभली. संत परंपरा, वारकरी पंथ हे महाराष्ट्राचे वैभव आहे. राजकीय अधिष्ठानापेक्षा वारकरी पंथाचे अध्यात्मिक आणि धार्मिक अधिष्ठान मोठे आहे. कारण धकाधकीच्या आयुष्यात पांडुरंगाचे नामस्मरण करताना चांगले विचार, चांगले कार्य करण्याचे विचार मनात येतात, दुष्ट विचार दूर जातात. मला काय मिळाले यापेक्षा दुसऱ्याला काय देणार हे महत्त्वाचे आहे. स्वत:साठी जगत असताना दुसऱ्याचे दु:ख वाटून घेण्याचे काम करणाऱ्यांपैकी वारकरी संप्रदाय आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री पदापूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. ते श्री क्षेत्र ओंकारेश्वर संन्यास आश्रम पंचायती आनंद आखाडा देवगाव खवणे तालुका मंठा जिल्हा जालना येथे वार्षिक गणेश महोत्सव निमित्त अकरा गाव एक गणपती व अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यातील ह. भ. प. समाधान महाराज शर्मा केज यांच्या आयोजित हरी कीर्तनाला उपस्थित भाविक भक्तांशी संवाद साधताना बोलत होते.

पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की श्री क्षेत्र ओंकारेश्वर येथे बारागाव एक गणपती हा उपक्रम महाराष्ट्रातील सर्व गणेश मंडळांना प्रेरणादायी ठरणार आहे. याच अनुषंगाने श्री क्षेत्र ओंकारेश्वर येथे एक कोटी रुपये किंमत असलेल सभागृह येत्या पुढील वर्षात आपण पूर्ण करणार असून त्याकरता विशेष निधीची तरतूद ही आपण करणार आहोत. या प्रसंगी मताधिपती गुरुवर्य परमश्रद्धेय श्री महंत भागवतगिरीजी महाराज श्री महंत बालकगिरीजी महाराज बाळासाहेब जाधव गणेशराव खवने राजेश मोरे नाथाराव काकडे विलास घोडके माऊली शेजूळ जिजाबाई जाधव विकास पालवे उदय बोराडे मनोज देशमुख यांच्या सह परिसरातील बारा ही गावातील हजारो महिला व पुरुषांची उपस्थिती होती.

# परतूरमध्ये शिकलकरी भागात शस्त्रसाठा जप्त, दोघांना अटक

**परतुर । प्रतिनिधी**

**परतुर शहर हे रेल्वे रूट वर असल्यामुळे सदरील साठा नांदेड हैदराबाद इथून येत असल्याचा प्राथमिक माहिती पोलिसांना असल्याचे संशय येत होते यामुळे परतूरमध्ये शिकलकरी भागात पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करून मोठा शस्त्रास्त्रांचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. दोन आरोपींच्या घरातून पाच गावठी भर्मार बंदूक, तीन धारदार तलवारी, कोयता, सत्तूर, खंजिर, चाकुसह देशी दारु जप्त केली आहे. यामुळे परतूर शहरात प्रचंड खळबळ उडाली आहे.**



करतारसिंग उत्तमसिंग पटवा आणि सोन्या सिंग प्रेम सिंग ठाकूर अशी अटक आरोपींची नावे आहेत. आरोपींच्या घरी शस्त्रास्त्रे ठेवली असल्याची माहिती परतूर पोलिसांना मिळाली होती. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी छापेमारी करत शस्त्रसाठा जप्त केला. सदरील कारवाई पोलीस अधिक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधिक्षक पियूष नोपानी, उपविभागीय पोलीस अधिकारी दादाहरी चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली परतुर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एम. टी. सुरवसे, सहायक पोलीस निरीक्षक जाधव, सहायक फौजदार शिंदे, रामदास फुपाते, विजय जाधव, गोविंद पवार, राम हाडे, नितीन बोंडारे, दीपक आढे, अचुत चव्हाण, अंबादास दांडगे, भागवत खाडे, गोपानवाड, सुनील पवार, गजानन राठोड, पवन धापसे, वाघ, गायकवाड, म.पो. का. कल्पना धडे, होम गार्ड काकडे, अखडे, जाधव यांनी कारवाई केली आहे.

# राजकीय नेत्यांच्या भेटीची बातमी तथ्यहिन-डॉ.ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**



लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी महाराष्ट्रभर वाढवलेली आणि रुजवलेली शिवसंग्राम बळकट करण्यासाठी गेली पंधरा दिवस राज्यातील शिवसंग्रामच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या बैठका ,गाठीभेटी मुंबई येथे सुरू आहेत. त्याचबरोबर लोकनेते विनायकराव मेटे साहेब मुंबईतील ज्या गणेश मंडळांना प्रतिवर्षी भेट द्यायचे त्या मंडळाच्या आग्रहास्तव रायगड, पेण, दिंडोशी , भिवंडी व मुंबई परिसरातील गणेश मंडळांना नियोजित भेटी दिल्या हे सर्व नियोजित कार्यक्रम सुरू असताना काही प्रसार माध्यमातून विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मी काही राजकीय पुर्ढा यांच्या भेट घेतल्या असल्याची तथ्यहीन बातमी प्रसार माध्यमातून पुढे आली वास्तविक पाहता असल्या कोणत्याही राजकीय भेटी झाल्या नसून सध्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसंग्राम बळकट करण्याच्या दृष्टीने कामकाज सुरू असल्याचे शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी म्हटले आहे.

# कोलकातामधील डॉक्टरांचा संप मिटणार?

**कोलकाता । वृतसंस्था**

पश्चिम बंगालमध्ये कोलकाताच्या आरजी कार मेडिकल कॉलेज-हॉस्पिटलमध्ये महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणी निवासी डॉक्टर आंदोलक आणि राज्य सरकार यांच्यातील संघर्ष सुरू आहे. दरम्यान, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शनिवारी (दि.१४ सप्टेंबर) आरोग्य भवन येथे आंदोलन करणाऱ्या डॉक्टर आंदोलकांची भेट घेतली. ममतांनी डॉक्टरांच्या मागण्यांवर अभ्यास करून आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. या भेटीचे डॉक्टर आंदोलनकर्त्यांनी स्वागत करत, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याकडे ईमेलद्वारे भेटीची वेळ मागितली असून आता हा संप मिटण्याची शक्यता आहे.

# ऐन सणात खाद्यतेलाच्या दरात वाढ; आयात शुल्क वाढीचा परिणाम

**पुणे । प्रतिनिधी**

**ऐण सणासुदीत केंद्र सरकारने खाद्यतेलांवरील आयात शुल्कात २० टक्के वाढ केली आहे. यामुळे बाजारात खाद्यतेलाचे दर प्रति किलो पंधरा रुपयांहून अधिक वाढले आहेत. अनेक घाऊक व्यापाऱ्यांनी शनिवारी (दि. १४) विक्री थांबवली असल्याचे दिसून आले आहे.**

केंद्र शासनाने कच्च्या पाम, सोया आणि सुर्यफूल तेलावर २० टक्के आयात शुल्क लावले आहे. या तिन्ही तेलांवर यापूर्वी ५.५ टक्के जुने शुल्क होते. ते आता कृषी अवसंरचना आणि विकास उपकर जोडून एकूण २५.५ टक्के झाले आहे. तसेच तिन्ही तेलाच्या रिफाईंडवर सुद्धा सर्व कर मिळून ३५.७५ टक्के शुल्क आकारला जाईल. जो आधी १३.७५ टक्के होता. पश्चिम महाराष्ट्रात प्रामुख्याने सूर्यफूल आणि सोयाबीन पेक्षा सरकी तेलाची मागणी जास्त असते. कच्च्या पाम तेल सोयाबीन आणि सूर्यफूल तेलावर २० टक्के आयात शुल्क लावल्यामुळे सरकीच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. बाजारात तेलाच्या किंमतीमध्ये आणखी फरक पडेल, असा अंदाज असून याबाबतचे ठोस माहिती सोमवार नंतरच मिळू शकेल.

### घाऊक व्यापाऱ्यांची साठेबाजी

किरकोळ व्यापाऱ्यांची बाजारातील तेल खरेदी आवश्यकतेनुसार होत असते. आयात शुल्कामध्ये केंद्र सरकारने तब्बल २० टक्के वाढ केल्याने किरकोळ बाजारात तेल विक्री दर वाढले आहेत. यातच घाऊक व्यापाऱ्यांनी साठेबाजी करून व्यापार बंद ठेवला आहे. सोमवारी बाजारातील तेजीचा फायदा उठवण्याच्या तयारीत घाऊक व्यापारी आहेत.

## पान १वरून...

### शेतकऱ्यांच्या सोयाबीनला

लावावे आणि सोयाबीन निर्यातीसाठी प्रत्येक क्विंटल मागे किमान ५० डॉलर इतके अनुदान द्यावे, अशा मागण्या केल्या होत्या. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून केंद्र शासनाने मागील आठवड्यातच सोयाबीनची ९० दिवस हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर खाद्यतेलावरील आयात शुल्क २० टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आपण केलेल्या ३ पैकी २ मागण्या मान्य केल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी एक्स या सोशल प्लॅटफॉर्मद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान, केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल तसेच या निर्णयासाठी सातत्याने आग्रह धरणारे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

---------

### होय, मी मध्यरात्री २.३० वाजता

असल्याचे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे. सामाजिक प्रश्नासाठी सामाजिक कार्यकर्ता लढत असताना राजकीय आरोप करून सामजिक कार्यकर्त्याची बदनामी करणे आपल्यासारख्या जेष्ठ नेत्याला शोभत नाही. शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर २ सप्टेंबर रोजी सरकारने अमानुष लाठीचार्ज केल्याने त्या भागात नागरिकांमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण होते, त्यामुळे मी स्वतः रात्री अडीच वाजता जाऊन त्या भागातील हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमींची विचारपूस केली, धीर दिला. जरांगे पाटील यांच्या कुटुंबाला धीर दिला, यात चुकीचे काय आहे का?, असा सवाल रोहित पवार यांनी दिला आहे. तसेच, आपण मध्यरात्री २.३० वाजता तेथे गेलो होतो, असेही रोहीत पवार यांनी मान्य केले.

ओबीसींचे राजकीय आरक्षण संपवणाऱ्या भाजपला टोकाचा विरोध करणारा आपल्यासारखा जेष्ठ नेता आज माझ्यावर तसेच राजेश टोपे यांच्यावर 'ज्यांच्या सांगण्यावरून आरोप करत आहेत त्याच नेत्याच्या' हातात आज गृहमंत्रालय आहे. त्यामुळे त्यांना सांगून माझ्यावरील आपण केलेले आरोप सिद्ध करून माझ्यावर कायदेशीर कारवाई करायला सांगा, हे माझे आपणास जाहीर आव्हान आहे, असे चॅलेंजच रोहित पवार यांनी छगन भुजबळ यांना दिलंय. तसेच, असो! हा शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र आहे. त्यामुळे दोन समाजात भांडणे लावण्याचा उचललेला विडा खाली ठेवा आणि महाराष्ट्राच्या जनतेला सुखाने नांदू द्या, तसेच भाजप नेत्यांच्या नादाला लागून महाराष्ट्राची वाट लावण्यापेक्षा जनतेच्या खऱ्या समस्यांकडे लक्ष द्या, अशी विनंतही रोहित पवार यांनी छगन भुजबळ यांना ट्विटरवरील पोस्टमधून केली आहे.

--------

### आता १० नोव्हेंबर रोजी

येत्या लोकसभा निवडणुकीपूर्वी शिक्षक भरतीची प्रक्रिया पूर्ण करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली होती.

-------

### ईद-ए-मिलादची सुट्टी

१६ सप्टेंबर, २०२४ रोजी घोषित केलेली ईद-ए-मिलाद ची सार्वजनिक सुट्टी रद्द करून ती आता बुधवार, १८ सप्टेंबर, २०२४ या दिवशी जाहीर करण्यात असल्याची अधिसूचना सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केली आहे.

-------

### तीन घराणेशाहीने काश्मीरला

आल्या, असे ते म्हणाले. ४२ वर्षांतील पंतप्रधानांची डोडा येथे ही पहिलीच भेट आहे. यापूर्वी १९८२ मध्ये इंदिरा गांधी यांनी डोडाला भेट दिली होती. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत पंतप्रधान मोदी किश्तवाडला गेले होते. डोडापासून ते ५८ किलोमीटर अंतरावर आहे. दरम्यान, १८ सप्टेंबर रोजी पहिल्या टप्प्यात २४ जागांवर मतदान होणार आहे.

-------

### जायकवाडीमधून

प्रकल्प प्रशासनाच्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी ६ वाजताच्या सुमारास जायकवाडीमध्ये प्रकल्प क्षमतेच्या ९८.३५ टक्के इतका होता. शुक्रवारी सकाळी सहा दरवाजांतून ३१४४ क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू होता. परंतु सकाळी नऊ ते साडेनऊ वाजेपर्यंत टप्प्याटप्प्याने प्रकल्पाचे सर्व दरवाजे बंद करून जायकवाडी प्रकल्पातून होणारा पाण्याचा विसर्ग थांबवण्यात आल्याची माहिती प्रकल्प प्रशासनाच्या सूत्राने दिली.

-------

### साखर कारखान्यांना

विचार करत केंद्राने आगामी गळीत हंगामासाठी ही बंदी उठवली आहे. आगामी हंगामात साखरेचे उत्पादन वाढण्याची शक्यता आहे. याव्यतिरिक्त, सरकारने २३ लाख टन तांदूळ भारतीय अन्न महामंडळ स्टॉकमधून धान्य-आधारित इथेनॉल डिस्टिलरींना विकण्यास परवानगी दिली आहे. यामुळे इथेनॉल उत्पादनात लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. साखर उद्योग अभ्यासकांच्या मते आता या निर्णयामुळे तयार होणारे अल्कोहोल केमिकल उत्पादन, देशी दारूचे उत्पादन तसेच फॉरेन लिकरसाठी उपयोगी असलेने त्यासाठीचे मार्केट कारखान्यांना उपलब्ध होवून उत्पन्नाचा स्त्रोत वाढविण्यास मदत होणार आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय कारखान्याना दिलासादायक आहे.

-----------

### मुख्यमंत्री योजनादूतसाठी मुदतवाढ,

योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या उपक्रमासाठी आतापर्यंत १ लाख ६६ हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे.

**उमेदवार निवडीचा निकष**

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे.

**अर्जप्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रे**

मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ, अधिवासाचा दाखला (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

--------

cmyk

## राष्ट्राच्या सांस्कृतिक,आर्थिक, प्राशासनिक, साहित्यिक उन्नतीसाठी हिंदी अध्ययन-अध्यापन आवश्यक-कुंडकर

**माजलगाव । प्रतिनिधी**

श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात हिंदी दिन संपन्न.मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे, विभाग प्रमुख रवींद्र खोडवे,पर्यवेक्षक सदाशिव ढगे, इत्यादी मान्यवरांच्या हस्ते राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर व श्री गणेश यांच्या प्रतिमेचे पूजन झाले.हिंदी अध्यापक अंकुश राठोड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना आदिनाथ कुंडकर म्हणाले हिंदी भाषा संसदीय कामकाजा साठी अत्यंत उपयोगी भाषा आहे.अंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वात ज्यास्त लोकांची बोली भाषा हिंदी आहे. हिंदी भाषेच्या माध्यमाध्यमातूनच भारतीय लोक वेद,पुराण उपनिषद्, साहित्य, दर्शन, समजू शकतात.हिंदी बोलताना इंग्लिश शब्द टाळावेत. शुद्ध हिंदी बोलावी. विभाग प्रमुख रवींद्र खोडवे अध्यक्षीय समारोप केला. मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे, रवींद्र खोडवे, पर्यवेक्षक सदाशिव ढगे इत्यादी मान्यवर, अन्य शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



# आरक्षणविरोधी राहुल गांधींच्या निषेधार्थ शिवसेनेच्या वतीने जोडे मारो आंदोलन

## आरक्षणाचा विरोध करणाऱ्या राहुल गांधींनी जनतेची माफी मागावी- जगताप, मुळूक

**बीड । प्रतिनिधी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आरक्षणविरोधी वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ आज शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या नेतृत्वाखाली बीड शिवसेनेच्या वतीने आज दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील जालना रोड येथे असलेल्या शिवसेना मध्यवर्ती कार्यालयासमोर राहुल गांधींविरुद्ध जोडे मारो आंदोलन केले. भारतीय संविधानाचा अपमान करणारे राहुल गांधी मुर्दाबाद, राहुल गांधी माफी मांगो, काँग्रेस मुर्दाबाद, असे नारे देऊन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्यासह शिवसेनेच्या उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी राहुल गांधी यांच्या प्रतिमेला जोडे मारले.




लोकसभा निवडणुकीआधी जातनिहाय जनगणना, आदिवासी, दलित जनतेबद्दल कळवळा दाखविणाऱ्या काँग्रेसची सामाजिक न्यायासंदर्भातली भूमिका किती दुटप्पी आहे, हे राहुल गांधी यांच्या अमेरिकेतील वक्तव्यातून स्पष्ट झाले आहे. काँग्रेसने कायम लोकशाही व संविधानाची पायमल्ली केली असून आता काँग्रेसची मजल आरक्षण रद्द करण्याची इच्छा व्यक्त करण्यापर्यंत गेली आहे. वारंवार विदेशात जाऊन भारताची बदनामी करण्याचे काम हे राहुल गांधी करत आहे. शिवसेना नेहमीच आरक्षणाचा सन्मान करत आली आहे, संविधानाचा सन्मान करत आली आहे. भारताची राज्यघटना बदलण्याचे काँग्रेसचे षडयंत्र आहे. त्यामुळेच काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत याबद्दल आपले खरे रूप दाखवत आहेत. अमेरीकेत जाऊन आरक्षण रद्द करू असे अपमानजनक विधान राहून गांधी यांनी केले. ही भारताला शर्मनाक करणारी बाब आहे. ही बाब भारताचे नागरिक व शिवसेना कदापि सहन करणार नाहीत. त्यामुळे गांधींनी भारताची माफी मागावी, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांनी केली आहे. याप्रसंगी शिवसेना महिला आघाडी, युवासेना, पदाधिकारी-लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिकांची उपस्थिती होती.

पान ६ वरून...

### जनजागृती रॅलीने वेधले

स्त्रियांचे रक्षण व विविध महापुरुषांच्या वेशभूषेमधील जिवंत देखाव्यांचे सादरीकरण केले या रॅलीचे उद्घाटन बापू खामकर यांच्या हस्ते केले.झाडे लावा झाडे जगवा, जय जवान जय किसान, विविध महापुरुषांचा घोषणा देत संपूर्ण शहरातून भव्यदिव्य रॅली आयोजित केली या रॅलीने धारूरकरांचे लक्ष वेधले पृथ्वीराज शिनगारे याने पाणी आडवा पाणी जिरवा झाडे लावा झाडे जगवा याविषयी विचार मांडले तर एडवोकेट परमेश्वर शिंगारे यांनी उपस्थित बालगोपाळ व नागरिकांना मार्गदर्शन केले धारूरकरांनी मोठ्या उत्साहात या रॅलीचे स्वागत केले शिवाजी महाराज चौकात राष्ट्रगीताने रॅलीचे सांगता केली. रॅली यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी यांनी मेहनत घेतली.

छत्रपती शिवाजी महाराज व मावळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, संत गाडगेबाबा, भारत माता , महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व मराठा योद्धा मनोज जरांगे यांच्या वेशभूषेतील बाल कलाकारांनी धारूर करांचे लक्ष वेधले

### चंपावती सम्राज्ञी होम मिनिस्टरमध्ये

अंतिम फेरीतील प्रथम विजेत्या स्पर्धकाला येवला पैठणी व मान चिन्ह देऊन चंपावती सम्राज्ञी या किताबाने मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येईल. द्वितीय विजेत्याला पेशवाई पैठणी, तृतीय विजेत्याला बनारसी पैठणी तर अंतिम सात स्पर्धकांना आकर्षक बक्षीसे मान्यवरांच्या हस्ते देण्यात येतील. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी काकु- नाना प्रतिष्ठान बीड आणि जयदत्तजी आण्णा क्षीरसागर विचारमंच महीला आघाडी बीड कार्यरत असुन या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अथवा अधिक माहितीसाठी ७०२०५४२७६६, ९५८८६४८५३९, ९३२५३२०१९०, ९३२५३८७७८१, बीड पुर्व ९८६०९०६८३५, बीड मध्य ९५१८९४७८२९, बीड पश्चिम ८६२४८१९८०१, बीड दक्षिण ९४०३२६७००८ या मोबाईल नंबर वर संपर्क साधुन अशा आगळ्यावेगळ्या उपक्रमात सहभागी होऊन आनंद द्विगुणित करावा असे आवाहन जयश्री विलास विधाते, बीड विधानसभा प्रमुख जयदत्तजी आण्णा क्षीरसागर विचारमंच महीला आघाडी यांनी केले आहे.

### न्याय व हक्कासाठी

सोनकांबळे, वामन पाईक,मिलिंद पोटभरे, अशोक किर्ते, बाबा देशमाने,अण्णा माने, विजय ठोंबरे, संदीप साळवे, बाबा ससाणे, विलास खळगे, राहुल वाघमारे, प्रकाश साळवे, भारत डावरे, रमेश पाईक, बबन चोपडे, सनी प्रधान, कपिल जावळे, अनिल भराटे, अभिजीत वाटवे, सुदर्शन भद्रे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

### धारूर बस स्थानकात

लाखो रुपये खर्च करून उभारलेले स्वच्छालय वापरा अभावी पडून आहे बस स्थानक येणाऱ्या प्रवाशी महिलांना, व शाळा महाविद्यालयातील विद्यार्थिनींची स्वच्छालय सुरू नसल्यामुळे गैरसोय होत आहे या प्रश्नाकडे आगार प्रमुखांनी गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर बस स्थानक परिसरातील शौचालय सर्व सोई सुविधा उपलब्ध करून सुरू करावे ,महिला व मुलींची होणारी हेळसांड थांबवावी अशी मागणी होत आहे.

### अष्टविनायक गणेश मंडळाचे

करून उत्सव साजरा होत आहे. यामध्ये रक्तदान शिबिर, जनजागृती रॅली, गाव स्वच्छता अभियान, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप असे विविध उपक्रम घेण्यात आले. १४ सप्टेंबर शनिवार रोजी गणेश मंडळाकडून नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी कृषी सहाय्यक नितीन जाधव, पत्रकार अतुल शिनगारे, व्हॉइस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सचिन थोरात, नेत्रतज्ञ डॉ. पवन सोनवणे डॉ. अभिषेक बाभुळगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शिबिरास सुरुवात करण्यात आली. पत्रकार सचिन थोरात व अतुल शिनगरे यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले तसेच विविध सामाजिक उपक्रमाचे कौतुक करून अष्टविनायक गणेश मंडळाचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या शिबिरामध्ये १५० रुग्णांनी नेत्र तपासणी करून लाभ घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन -आभार कुलदीप साखरे यांनी मानले. शिबिर यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष दादासाहेब साखरे, अविनाश साखरे , गणेश वारे, गणेश सुरेश साखरे, खंडू साखरे सह इतर पदाधिकारी सदस्य यांनी परिश्रम घेतले. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अवैध धंदे करणाऱ्यांवर अंभोरा

पोलिस काका व पो.दिदी जनजागृती उपक्रम..

शालिय जिवनात होणारे लैंगिक शोषण, अत्याचार अन्? अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिस काका दिदी हा उपक्रम शाळा महाविद्यालयात घेऊन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली गेली अशा वेगवेगळ्या उपक्रमातून गुन्हेगार व गुन्हेगारी वृत्तीला मुळासकट नष्ट करण्याचे धोरणं अंभोरा पोलिस स्टेशन सपोनि मंगेश साळवे व त्यांच्या सर्व टिमचे असल्याचे दिसून येते.

### पिवळी ज्वारी

खिचडी, लाडू, पराठा, वडा, तांदूळ, पॅनकेक आणि डोसे हे पिवळ्या ज्वारीचा वापर करून बनवता येणारे पारंपारिक पदार्थ आहेत. त्याचा उपयोग जनावरांसाठी चारा म्हणूनही करता येतो. पिवळ्या ज्वारीच्या पॅकमध्ये १०% मिनिट प्रथिने, १२% जास्तीत जास्त आर्द्रता, २% जास्तीत जास्त परदेशी पदार्थ, २% जास्तीत जास्त तुटलेले आणि २% जास्तीत जास्त खराब झालेले धान्य असते.

मधुमेह असलेल्या लोकांसाठी पिवळा ज्वारीच्या भाकरी एक चांगला आहार पर्याय असू शकतो.

## गणेश मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा-डॉ.इंगोले यांचे आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सार्वजनिक गणेशोत्सवात उत्कृष्ट व्यसनमुक्तीपर देखावा सादर करणाऱ्या गणेश मंडळांना आकर्षक बक्षिसे देणार असल्याची माहिती सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक समितीचे इंडीयन मेडीकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे देवून स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.



अंबाजोगाई मध्ये उत्कृष्ट व्यसनमुक्तीपर देखावा सादर करणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांसाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती समाधान मानसोपचार व व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ.राजेश इंगोले यांनी दिली आहे. दरवर्षी डॉ.राजेश इंगोले यांच्या पुढाकारातून या स्पर्धा गेल्या सात वर्षांपासून सातत्याने घेण्यात येत आहेत. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी समाज एकत्रित येऊन समाजासाठी विधायक कार्य करण्यासाठी गणेशोत्सव सुरू केला त्याच विचारांचा वारसा जपण्याचे काम म्हणून समाजप्रबोधन व्हावे आणि समाज व्यसनापासून दूर रहावा या करिता गणेशोत्सवाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणारे अंबाजोगाई शहरातील सार्वजनिक गणेश मंडळ जे दरवर्षी आकर्षक, समाजातील व्यसनाधीनतेवरवर प्रबोधन, जनजागृती करणारे देखावे साकारतात त्यांना आणखीन प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत सहभागी गणेश मंडळांना पहिल्या क्रमांकाच्या उत्कृष्ट व्यसनमुक्ती पर देखाव्यास ११ हजार रूपये, द्वितीय क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेश मंडळास ७ हजार रूपये आणि तृतीय क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेश मंडळास ५ हजार तसेच दोन गणेश मंडळास उत्तेजनार्थ प्रत्येकी २ हजार रूपये इतक्या रकमेची रोख पारितोषिके देवून विजेत्या गणेश मंडळांना गौरविण्यात येणार आहे. दरम्यान, उत्कृष्ट व्यसनमुक्तीपर गणेश देखाव्यांची निवड करण्यासाठी एक समिती ही गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मंडळांनी त्यांची नांव नोंदणी करण्यासाठी समाधान व्यसनमुक्ती केंद्र मोबाईल क्रमांक - ९५२९८९३०३० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## माणसातील माणूस घडविण्याचे काम शिक्षणातून होते -प्रा.सुदर्शन स्वामी

माजलगाव।प्रतिनिधी

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यावर प्रचंड तणाव वाढला असल्याने विद्यार्थी संभ्रमात आहे.धावपळीच्या जीवनात माणसातला माणूस हरवत चाललेला आहे परंतु मूल्यावर्धित शिक्षणातुन संस्कारमय माणसातील माणूस घडववीला जातो असे प्रतिपादन प्रा. सुदर्शन स्वामी यांनी ईगलवुड महाविद्यालयामध्ये बोलताना व्यक्त केले.

इगलवूड पॉलिटिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ व पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ.अर्चना पवार होत्या तर प्रा. सुदर्शन स्वामी,एसबीआय चे माजी लेखापाल सुरेश भानप, डॉ. सुशील लोढा,डॉ.शरद पवार, प्राचार्य प्रतीक वेळापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना प्रा. सुदर्शन स्वामी म्हणाले की ईगलवुड कॉलेजच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मुलांना कौशल्यभिमुख



शिक्षणाची संधी प्राप्त झाली आहे.त्यामुळे नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. विद्यार्थ्यांनी अभ्यासात चिकाटी,सातत्य,कठोर परिश्रम केल्याने ध्येय साध्य होईल. यावेळी बोलताना सुरेश भानप म्हणाले की अभियांत्रिकी क्षेत्रातही नोकरीच्या खूप संधी आहेत ग्रामीण भागातील मुलांनी अभियांत्रिकी क्षेत्रात पुढे यावे व पालकांनीही त्यांना प्रोत्साहन द्यावे. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.सुशील लोढा व सचिव डॉ शरद पवार यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासचे अध्यक्षीय समारोप करताना समारोप डॉ अर्चना पवार यांनी मौलिक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची प्रास्ताविक प्राचार्य प्रतीक वेळापूर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. महेश जाधव यांनी केले तर आभार प्रा बळीराम गायकवाड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.वैभव भंडारी ,प्रा. ऋतुजा वेळापुरे,प्रा. सिद्धेश्वर कचरे,प्रा.अक्षय अलझेंडे,प्रा.सारिका वाघ,प्रा. पौर्णिमा वैष्णव,प्रा.अपूर्वा तांगडे, प्रा. योगेश्वरी मगर यांनी परिश्रम घेतले.

# माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते पेठ बीड मधील देखाव्यांचे उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

शहरात अनेक ठिकाणी यावर्षी गणेश मंडळांनी श्री गणेशाची स्थापना करून मोठमोठे देखावे सादर केले आहेत आज माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते पेठ बीड मधील महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या आणि देखाव्यासाठी प्रसिद्ध असलेल्या मंडळाच्या सादर केलेल्या देखाव्यांचे उद्घाटन करून हजारो गणेश भक्तांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली यावेळी गणेश भक्तांचा आनंद ओसंडून वाहणारा होता

बीड शहरात पेठ बीड हा भाग देखाव्यासाठी कित्येक वर्षापासून प्रसिद्ध आहे अनेक गणेश मंडळाला ६० ते ६५ वर्षाची परंपरा लाभलेली आहे या गणेश मंडळांना दरवर्षी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर भेट देत असतात आज भोईराज तरुण गणेश मित्र मंडळ भोई गल्ली, विघ्नहर्ता गणेश मित्र मंडळ बुरुड गल्ली,आझाद हिंद गणेश मित्र मंडळ पेठ बीड, नवरंग



गणेश मित्र मंडळ पेठ बीड, राष्ट्रीय गणेश मित्र मंडळ पेठ बीड, जय तुळजाभवानी गणेश मित्र मंडळ शनिवार पेठ,श्री दत्तात्रय गणेश मंडळ साळ गल्ली पेठ बीड, महाराणा प्रताप गणेश मंडळ हिरालाल चौक बीड या गणेश मंडळाची आरती माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आली तर ४ मोठ्या देखाव्याचे उदघाटन देखील करण्यात आले,या भागाचे नगरसेवक राणा चव्हाण,अमृत काका सारडा,आदित्य सारडा,राजेंद्र बनसोडे,अशोक शेटे,सचिन गुणवंत,शिवलिंग क्षीरसागर, सुशांत सोनटक्के,स्वप्नील विभूते,कानडे अप्पा,कार्तिक आष्टेकर,राजू ताठे,पावन लड्डा,आदींच्या प्रमुख उपस्थितीत देखावे सादर करण्यात आले,लहानापासून ते वृद्धांपर्यंत गणेश भक्त यावेळी गर्दीने जमा झाले होते,प्रचंड उत्साह आणि माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या उपस्थिती मुळे तरुण गणेश भक्त देखील आनंदी झाले होते,ठिकठिकाणी स्वागत आणि आदरातिथ्य बघायला मिळाले,यावेळी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनीही जिथे मोठे वाहन जाऊ शकत नाही तिथे गणेश भक्तांच्या आग्रहाखातर स्वतः बुलेट चालवत भेटी दिल्या,यावेळी आशिष काळे आदींची उपस्थिती होती

## तणावाचा रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

तणावाचा आपल्या शरीरावर आणि मनावर खोलवर परिणाम होतो याचा केवळ आपल्या मानसिक आरोग्यावरच परिणाम होत नाही तर आपल्या शारीरिक आरोग्यावरही परिणाम होतो. तणावामुळे शरीरात अनेक प्रकारचे हार्मोन्स बाहेर पडतात, त्यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ शकते.

डॉक्टरांच्या मते,ताण घेतल्याने युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शनची (युटीआय) समस्या उभ्दवू शकते. युटीआय एक सामान्य समस्या आहे. जी विशेषतः महिलांमध्ये दिसून येत. तणावामुळे युटीआय ची समस्य उभ्दवू शकते. जेंव्हा आपल्याला काही आव्हान किंवा दबाव येतो तेंव्हा तणावाची समस्या उभ्दवते. कामाचा ताण, कौटुंबिक समस्या आर्थिक समस्या इत्यादी कारणांमुळे तणाव येतो. यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ शकते.

युटीआय म्हणजे मुत्रमार्गाचा संसर्ग, हा संसर्ग बहुतेक जिवाणुंमळे होतो, जे मुत्रमार्गात प्रवेश करतात आणि संसर्ग पसरतात. यूटीआय च्या सामान्य लक्षणामध्ये लघवी करताना जळजळ होणे, लघवी करण्याची वारंवार इच्छा होणे,खालच्या ओटीपोटात दुखणे आणि लघवीला दुर्गंधी येणे याचा समावेश होतो.

तणावामुळे जेंव्हा रोग प्रतिकारक शक्ती कमकुवत होते तेंव्हा आपले शरीर संक्रमणांशी लढण्यास कमी सक्षम होते.त्यामुळे युटीआय सारखे आजार होण्याची शक्यता वाढते. तणावामुळे शरीरात काही हार्मोन्सची पातळी वाढते. ज्यामुळे मुत्रमार्गाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. तणाव कमी करण्यासाठी योग्?,ध्यान आणि नियमित व्यायाम करावा तसेच दिवसभर पुरेसे पाणी प्यावे, जेणेकरून विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढता येतील असे मत डॉ.जगदीश श्रीराम ट ेकाळे एम.बी.बी.एस.,एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

## जय हनुमान गणेश मंडळाच्या वतीने सारणी (आ) येथे रक्तदान शिबिर संपन्न

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील सारणी (आ) येथील जय हनुमान गणेश मंडळाच्या वतीने वेगळा व सामाजिक उपक्रम हाती घेत गावात रक्तदान शिबिराचे आयोजन केले गेले होते या शिबिराचा शुभारंभ सरपंच संतोष (बप्पा) सोनवणे व उप सरपंच रवि बापू सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आला.

गणेश उत्सवात सद्या डिजे कडे तरुणांचा मोठा ओढा आहे मात्र यामध्ये असेही काही तरुण व गणेश मंडळ आहेत ते आपली सामाजिक बांधिलकी जपत वेगवेगळे सामाजिक उपक्रम घेत असतात असाच उपक्रम केज तालुक्यातील सारणी (आ) येथील जय हनुमान गणेश मंडळाच्या वतीने सारणी येथे



घेण्यात आला शनिवार दि.१४ रोजी सकाळी गावातील हनुमान मंदीरात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते यामध्ये जवळपास २८ रक्तदात्यानी रक्तदान केले यावेळी गणेश मंडळाच्या वतीने रक्तदान करण्याऱ्या व्यक्तींना एक फळाचे झाड भेट देण्यात आले व हे झाड जपल्यास मंडळाच्या वतीने त्या रक्तदात्याना एक हजार रुपयाचे बक्षीस देखील देण्याचे यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले त्यामुळे झाड देऊन त्याचे संगोपन देखील करा असा सल्लाच यावेळी मंडळाच्या वतीने देण्यात आला.

यावेळी सारणी (आ) चे उप सरपंच रवि सोनवणे यांच्यासह अनेक रक्तदात्याणी रक्तदान केले. यावेळी मंडळाचे पदाधिकारी विशाल सोनवणे, सुसेन सोनवणे, अक्षय सोनवणे, यांचेसह अनेक तरुण यावेळी उपस्थित होते.-

cmyk

राज्य लोकतंत्र शेत-शिवार
रविवार दि.१५ सप्टेंबर २०२४
४

# देशाच्या इथेनॉल उत्पादन क्षमतेत १६२३ कोटी लिटरपर्यंत वाढ

पुणे : देशाची इथेनॉल उत्पादन क्षमता ऑगस्टअखेर १६२३ कोटी लिटरपर्यंत वाढली आहे. केंद्रीय अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाने 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून ही माहिती दिली. २०१७-१८ ला ही क्षमता ५१८ कोटी लिटर होती. केंद्राने सातत्याने इथेनॉल निर्मितीसाठी प्रयत्न केल्याने उत्पादन क्षमतेमध्ये वाढ झाली आहे. येणाऱ्या काळामध्ये इथेनॉल निर्मितीला बळ देण्याची शक्यता असल्याने या क्षमतेत वाढ होणार असल्याचे केंद्रीय सूत्रांनी सांगितले.

अलीकडेच, सरकारने साखर कारखान्यांना आणि डिस्टिलरीजना इथेनॉल पुरवठा वर्ष २०२४-२५ दरम्यान उसाचा रस, बी-हेवी मोलॅसिस आणि सी-हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल तयार करण्याची परवानगी दिली आहे. या व्यतिरिक्त, सरकारने पूर्वीची बंदी उठवली आहे आणि २३ लाख टन तांदूळ भारतीय फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या



स्टॉकमधून धान्य-आधारित इथेनॉल डिस्टिलरींना विकण्याची परवानगी दिली आहे. यामुळे इथेनॉल उत्पादनात लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे. केंद्र सरकार इथेनॉल निर्मितीवरील सर्व निर्बंध हटवण्याच्या विचारात आहे. मध्यंतरी आततायीपणे घेतलेल्या इथेनॉलनिर्मिती निर्बंधाच्या निर्णयाचा पश्चाताप करण्याची वेळ केंद्र सरकारवर आली आहे. अनेक नवीन प्रकल्प सुरू होण्याआधीच बंद राहिले. याचा फटका इथेनॉल उत्पादनाला बसला. आता ही चूक सुधारून इथेनॉल मिश्रण कार्यक्रमाला बाधा येईल, असे निर्णय न घेण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत असल्याचे सूत्रांनी सांगितले. एकत्रित इथेनॉल मिश्रण पोहोचले १३.३ टक्क्यांपर्यंत वाढत्या क्षमतेमुळे देशांतर्गत इथेनॉलच्या गरजा पूर्ण होतील, असा केंद्राचा विश्वास आहे. पेट्रोलमध्ये २० टक्के मिश्रणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, अंदाजे १०१६ कोटी लिटर इथेनॉलची आवश्यकता असेल, इतर वापरांसाठी एकूण १३५० कोटी लिटर इथेनॉल लागणार आहे. २०२५ पर्यंत सुमारे १७०० कोटी लिटर इथेनॉल उत्पादन क्षमता आवश्यक आहे. नोव्हेंबर २०२३ ते जुलै २०२४ पर्यंत एकत्रित इथेनॉल मिश्रण १३.३ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे.

## राजस्थानमध्ये शेतकऱ्यांना ८ लाख सीडकीटचे मोफत वाटप



जयपूर : भरडधान्य लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राजस्थानच्या कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना २०२४-२५ या आर्थिक वर्षी शेतकऱ्यांना बाजरीचे ७ लाख ९० हजार तर ज्वारीचे ८९ हजार बीज मिनिकिटचे मोफत वितरण करण्यात आले आहे. त्यामुळे या राज्यात भरडधान्याच्या उत्पादनात वाढ होऊन त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे.


ज्वारी, बाजरी ही कमी पाण्यावर येणारी भरडधान्य पिके आहेत. बाजरीला सुपरफुडचाही दर्जा देण्यात आला आहे. बाजरी, ज्वारी, नाचणी तृणधान्ये तर राळा, वरई, कोद्रा, सावा राजगिरा ही लघुधान्य आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले होते. रक्तातील सारखेची पातळी नियंत्रित करते. रक्ताभिसरण वाढवते. ज्वारी वजन कमी करण्यास मदत करते. हाडांच्या आरोग्यासाठी ज्वारी उपयुक्त ठरते. शरीरातील ऊर्जा पातळी सुधारते. तसेच ह्रदयाचे आरोग्यही ज्वारीमुळे सुधारते. बाजरीमध्ये कॅल्शियम, विटामिन , व फॉस्फरस, लोह, मँगेनीज अधिक मात्रेत उपलब्ध असते. रक्तातील मेदाचे प्रमाण नियंत्रित, रक्तदाबावर नियंत्रण, हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी व ॲनेमिया आजारावर मात करण्यासाठी बाजरी उपयुक्त आहे. शक्तीवर्धक, पित्तशामक असल्याने नाचणी रक्त शुद्ध करण्यास उपयुक्त आहे. कॅल्शियम आणि लोह मुबलक असल्याने गरोदर माता व वयोवृद्ध व्यक्तींना हाडांसाठी व ॲनिमियावर नाचणीचे पदार्थ उपयोगी ठरतात. नाचणीमुळे लठ्ठपणा कमी करणे, मधुमेही रुग्णांसाठी गुणकारी, यकृतातील चरबी कमी करण्यास मदत होते.

# बाजारातून दुधाळ जनावरांची खरेदी करताना या बाबी तपासा

शेतकरी असण्याबरोबरच तुम्ही उत्तम पशुपालक होण्याचा विचार करीत असाल तर तुम्ही आधी उत्तम जनावरांची निवड केली पाहिजे. बाजारातून जनावरे विकत घेत असताना अनेक महत्वाच्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. उपलब्ध परिस्थितीत दुधाळ जनावराची कोणती जात नफा देऊ शकेल अशी जात निवडावी. जर फक्त दूध उत्पादन हाय पशुपालकाचे हेतू असेल तर म्हैस पालन करणे कधीही उत्तम ठरते.

दुधाळ जनावरांची निवड कशी करावी?

जनावराचा पाठीचा कणा वाकलेला असू नये. जनावरांची पहिली बरगडी दिसते स्वाभाविक असले तरी तिसरा बरगडी पर्यंत दिसणारी जनावरे अशक्त या प्रकारात मोडतात. गाईच्या पोटाचा तसेच छातीचा भाग लांब, खोल आणि रुंद असावा. उत्तम खाद्य पचवण्याची क्षमता असलेल्या जनावरांची निवड करावी. कास आणि सडाची तपासणी करावी. कासेची खोली मापक व क्षमता पुरेशी असावी. सड काशेच्या प्रत्येक चतुर्थांश प्रमाणबद्ध असावी. काटकोनात स्थित असावेत. मागील कास रुंद, उंच व घट्टपणे शरीराशी शी संलग्न असावी. किंचित वर्तुळाकार पद्धतीने मुळास जोडलेली असावी. कासेचे विभाजन पुरेशा प्रमाणात संतुलित असावे. पुढची कास घट्टपणे संलग्न असून त्याची लांबी मध्यम आणि क्षमता पुरेशी असावी. सड दंडगोलाकार, एकसमान आकाराचे व मध्यम लांबी आणि व्यास असावा. कासेस चार व्यतिरिक्त अधिक सड असू नये. सडातून हृदयाकडे जाणारी रक्तवाहिनी प्रशस्त व फुगीर असावे. जनावरांच्या दाताचे पाहणी करून वयाची खात्री करता येते. या वयातील जनावरे चार



दाती असतात.

जनावरांमध्ये गर्भपाताच्या घटनेचे प्रमाण तसेच कासदाह आजाराचा प्रादुर्भाव कधी झाला होता का याची माहिती घ्यावी. चारही सड पिळून पाणी उत्तम यामुळे सडनलिका बंद नाही याची खात्री होते.

जनावरे आजारी असल्याची लक्षणे : अनेक आजारांचे जनावरांच्या बाह्य लक्षणांवरून निदान केले जाऊ शकते जसे की डोळ्यांतून आठवा नाकातून स्राव येणे हे जनावर आजारी असल्याचे लक्षण आहे. तसेच योनी मार्ग अथवा गुद्दारातून रक्त किंवा अस्वाभाविक स्राव येणे योनीचे आजाराचे लक्षण आहे. आजारी जनावर सुस्त, मलुल व अशक्त झालेले असते. काही आजारात बाह्य लक्षणे दिसून येत नाहीत. आजारापासून वाचण्यासाठी जनावरांची नियमित लसीकरण केले जाते का याची चौकशी करावी व तसेच पशु वैद्यकीय प्रमाणपत्र दाखवण्याचा आग्रह करावा.

गायींची निवड : आपल्याकडे होल्स्टिन संक्रीत आणि जर्सी संकरित गाई दिसतात. होल्स्टिन गायीचे दुधाचे प्रमाण अधिक आहे. तर जर्सी संकरित गाईच्या दुधात स्निग्धांश अधिक असते. गरजेप्रमाणे जर्सी किंवा होल्स्टिन गाईची निवड करावी. संकरित गाई घेताना पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता लक्षात घेता विदेशी रक्ताचे प्रमाण ६२.५० टक्क्यांपेक्षा अधिक असू नये. जर्सी संकरित गाई डोंगराळ भागात संगोपनासाठी चांगले आहेत तर होल्स्टिन संकरित गाईंचे संगोपन पठारी भागात करावे.

# मत्स्यपालनात आहार म्हणून शेवग्याच्या पानांचा वापर फायदेशीर

मत्स्यपालन करताना माशांना वेगवेगळ्या प्रकारचा आहार दिला जातो, ज्यामुळे त्यांचे आरोग्य आणि वाढ चांगली होते. माशांसाठी मोरिंगा म्हणजेच शेवग्याची पाने यापासून तयार केलेली पावडर एक उत्तम पर्याय म्हणून समोर आले आहे. मत्स्यपालनात आहारामध्ये मोरिंगा वापरल्याने मासे निरोगी राहण्यास आणि मत्स्यशेती सुरळीत चालण्यास मदत होऊ शकते.

'मोरिंगा' माशांसाठी सुपरफूड : मत्स्यपालन आहारात मोरिंगा वापरणे हे माशांसाठी एक प्रकारचे सुपरफूड आहे. त्यामुळे माशांची रोगप्रतिकार क्षमता वाढते. मोरिंगा पानांमध्ये मासे निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक असलेले सर्व पोषक घटक असतात. त्यात दहा प्रकारचे अत्यावश्यक अमीनो ॲसिड असतात, जे प्रथिने बनवण्यास मदत करतात. याशिवाय यामध्ये अनेक प्रकारची जीवनसत्त्वे असतात. म्हणून जर आपण मोरिंगा माशांना खायला दिले तर ते अधिक निरोगी आणि मजबूत राहतील. हे कृत्रिम अन्नापेक्षा चांगले आहे कारण ते नैसर्गिक आहे आणि त्यात कोणतेही हानिकारक रसायने नसतात. मत्स्यपालन आहारात मोरिंगा वापरल्याने मासे निरोगी राहतील आणि मत्स्यपालकांनाही फायदा होईल.

मोरिंगापासून माशांना मिळतात प्रथिने : माशांच्या वाढीसाठी आणि पुनरुत्पादनासाठी प्रथिने अत्यंत आवश्यक आहेत. संशोधनात असे आढळून आले आहे की माशांच्या बाळांना किमान ३० टक्के प्रथिने आवश्यक असतात. मत्स्यपालक




सामान्यतः माशांसाठी प्रथिनांचा स्रोत म्हणून फिश फूडचा वापर करतात परंतु, फिश फूडच्या वाढत्या मागणीमुळे, त्याच्या उत्पादनासाठी नैसर्गिक संसाधनांवरही दबाव वाढत आहे. अशा स्थितीत मत्स्य खाद्यामध्ये मोरिंगासारख्या पर्यायी प्रथिन स्त्रोतांचा वापर जलचर शेतीमध्ये वाढत आहे. मोरिंगामध्ये प्रथिने जास्त असतात आणि त्यात सर्व आवश्यक अमीनो ॲसिड असतात. त्यामुळे माशांच्या आहारासाठी मोरिंगा हा चांगला पर्याय आहे. मोरिंगा पानांच्या पावडरमुळे २५-३७ टक्के प्रथिने आहेत जे माशांच्या वाढीस मदत करतात आणि त्यांची रोग प्रतिकारशक्ती देखील वाढवतात.

मत्स्यव्यवसायात मोरिंगाचे फायदे : मोरिंगा वनस्पतीच्या पानांमध्ये, बिया आणि सालामध्ये विविध प्रकारचे फायटोकेमिकल्स असतात, जसे की फ्लेव्होनॉइड्स, फेनोलिक ॲसिड आणि अँथ्राक्विनोन. हे घटक माशांचे आरोग्य सुधारण्यास, प्रतिकारशक्ती वाढविण्यास आणि त्वचेची चमक वाढविण्यास मदत करतात. एवढेच नाही तर पारंपारिक अँटीबायोटिक्स आणि रासायनिक औषधांना मोरिंगा वापरणे हा स्वस्त आणि प्रभावी पर्याय आहे. हे माशांच्या वाढीस, त्वचेचा रंग वाढण्यास मदत करते आणि कोणत्याही हानिकारक प्रभावाशिवाय रोगांशी लढण्यास मदत करते.

शोभेच्या माशांसाठी महत्त्वाचा आहे मोरिंगा : तिलापिया, सीब्रेम, गिबल कार्प आणि गप्पी यांसारख्या शोभेच्या माशांसाठी मत्स्यपालन आहारात मोरिंगा वापरणे खूप फायदेशीर आहे, कारण अभ्यासात असे आढळून आले आहे की जर माशांच्या आहारात १० ते १५% मोरिंगा समाविष्ट केले तर मोरिंगामध्ये कॅरोटीनोइड्स असतात ज्यामुळे माशांच्या त्वचेचा रंग गडद होऊ शकतो. तसेच याचा माशांच्या वाढीवर कोणताही वाईट परिणाम होत नाही. म्हणजेच, फिश फुडपेक्षा मोरिंगा हा प्रोटीनसाठी चांगला पर्याय मानला जाऊ शकतो. मोरिंगामध्ये एक विशेष घटक आढळतो, ज्याला फिनाईल आयसोथियोसायनेट म्हणतात. यात प्रतिजैविक गुणधर्म आहेत, ज्यामुळे मासे चांगले वाढतात आणि त्यांची मर कमी होण्यास मदत होते.

माशांच्या आहारात मोरिंगाचा वापर कसा करायचा? : मोरिंगा ची पाने नीट धुवून वाळवा आणि नंतर बारीक करून पावडर बनवा. ही पावडर माशांच्या आहारात मिसळता येते, त्यामुळे माशांना अधिक पोषक द्रव्ये मिळू शकतात.




## जागतिक दिवस: हिंदी दिवस

### महत्वाच्या घटना

७८६ : हरुन अल रशिद बगदादचा खलिफा झाला.
१८९३ : सरदार खाजवीवाले, श्री. गणपतराव घोटवडेकर व भाऊ रंगारी यांनी पुण्यात पहिल्यांदा सार्वजनिक गणपती बसवले. लोकमान्य टिळकांनी हा उपक्रम उचलून धरून त्याला राष्ट्रीय उत्सवाचे स्वरुप दिले. हीच सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात होय.
१९१७ : रशियाने स्वत:ला प्रजासत्ताक घोषित केले.
१९४८ : दोन तासांच्या चकमकीनंतर भारतीय सैन्याने दौलताबादचा किल्ला जिंकून घेतला. देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य नष्ट झाल्यानंतर सुमारे साडे सहाशे वर्षांनी स्वतंत्र झालेल्या किल्ल्यात भारतमातेचे मंदिर उभारण्यात आले.
१९४९ : हिंदी हि भारताची राष्ट्रभाषा म्हणून घोषित करून हिंदी दिन साजरा केला.
१९५९ : सोव्हियेत संघाचे लुना २ हे अंतरिक्षयान चंद्रावर कोसळले. चंद्रापर्यंत पोचणारी ही पहिली मानवनिर्मित वस्तू होती.
१९६० : ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कन्ट्रीज' ची स्थापना झाली.
१९७८ : 'व्हेनेरा-२' हे रशियाचे अंतराळयान शुक्राकडे झेपावले.
१९९५ : संगीतकार दत्ता डावजेकर यांना महाराष्ट्र सरकारचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर
१९९९ : किरिबाटी, नौरू व टोंगा या राष्ट्रांचा संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रवेश.
२००० : मायक्रोसॉफ्ट कंपनी ने विंडोज एमई रिलीज केले.
२००३ : इस्टोनियाच्या जनतेने जनमत चाचणीत युरोपीय संघात सामील होण्यासाठीचा कौल दिला.
२०१५ : गुरुत्वीय लहरी गुरुत्वीय लहरींचे पहिले निरीक्षण करण्यात आले.
२०१७ : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान शिंजो आबे यांनी आज संयुक्तपणे भारताच्या पहिल्या हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पाची पायाभरणी केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७१३ : योहान कीज जर्मन गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ (मृत्यू: २९ जुलै १७८१)
१७७४ : भारतातील वे१४ राज्यपाल जनरल लॉर्ड विलियम बेंटीक यांचा जन्म. (मृत्यू: १७ जून १८३९)
१८६७ : विष्णू नरसिंह जोग वारकरी शिक्षणसंस्थेचे संस्थापक, कीर्तनकार, प्रवचनकार आणि लेखक (मृत्यू: ५ फेब्रुवारी १९२०)
१८९७ : पार्श्वनाथ आळतेकर नट, दिग्दर्शक व नाट्यशिक्षक (मृत्यू: २२ नोव्हेंबर १९५७)
१८९८ : महाराष्ट्रीयन मराठी नाट्य-चित्र अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते, नाट्यसंस्था स्थापक पार्श्वनाथ आळतेकर यांचा जन्मदिन.
१९०१ : यमुनाबाई हिर्लेकर शिक्षणतज्ञ व विचारवंत (मृत्यू:)
१९१४ : भारतीय हिंदी चित्रपत सृष्टीतील सुप्रसिद्ध चित्रपट निर्माता आणि दिग्दर्शक जी. पी. सिप्पी यांचा जन्मदिन.
१९२१ : दर्शनसिंहजी महाराज शिख संतकवी, 'मंजील-ए-नूर' आणि 'मता-ए-नूर' या ऊर्दू कवितासंग्रहांबद्दल त्यांना ऊर्दू अकादमीचे पुरस्कार मिळाले. (मृत्यू: ३० मे १९८९)
१९२३ : राम जेठमलानी केन्द्रीय कायदामंत्री, कायदेपंडीत, प्रसिद्ध भारतीय राजकारणी व कायदेपंडित तसचं, माजी भारतीय बार कौन्सिलचे अध्यक्ष आणि सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष
१९३२ : डॉ. काशिनाथ घाणेकर मराठी रंगभूमी आणि चित्रपटातील अभिनेते (मृत्यू: २ मार्च १९८६)
१९४८ : वीणा सहस्रबुद्धे प्रख्यात भारतीय ग्वाल्हेर व जयपूर येथील किराणा घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील गायक व संगीतकार
१९५७ : केपलर वेसेल्स दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेटखेळाडू
१९६३ : रविंद्र रामनारायण ऊर्फ 'रॉबिन' सिंग अष्ट्पैलू क्रिकेटपटू व प्रशिक्षक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८९१ : पोप स्टीफन (पाचवा) (जन्म: )
१९०१ : अमेरिकेचे वे२५ राष्ट्राध्यक्ष विल्यम मॅकिन्ले यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १८४३)
१९७१ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित भारतीय बंगाली भाषिक कादंबरीकार, लेखक व साहित्यकार ताराशंकर बंद्योपाध्याय यांचे निधन.
१९७९ : नूर मोहम्मद तराकी अफगणिस्तानचे तिसरे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १५ जुलै १९१७)
१९८५ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध संगीतकार रामकृष्ण शिंदे यांचे निधन.
१९८९ : बेन्जामिन पिअरी पाल आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय कृषी संशोधक, पद्मश्री (१९५८), पद्मभूषण (१९६८), इंडीयन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल रिसर्च () चे पहिले संचालक, तांबेरा रोगाला दाद न देणार्या व अधिक उत्पादन देणार्या गव्हाच्या जाती त्यांनी शोधून काढल्या. (जन्म: २६ मे १९०६)
१९९८ : प्रा. राम जोशी शिक्षणतज्ञ व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म:)
२०११ : हरिश्चंद्र बिराजदार कुस्तीगीर व प्रशिक्षक (जन्म: ५ जून १९५०) ध्यानचंद पुरस्कार सन्मानित भारतीय कुस्तीगीर व प्रशिक्षक
२०१५ : सबवे चे सहसंस्थापक फ्रेड डेलुका यांचे निधन. (जन्म: ३ ऑक्टोबर १९४७)

# बाजार समितीमध्ये बंजारा समाजाचा शेतकरी मेळावा

जालना । प्रतिनिधी

कृषि उत्पन्न बाजार समिती, जालनाचे बाजार आवारातील गुळ मार्केट शेजारील गोडायुन मध्ये बंजारा समाजाचा भव्य बंजारा शेतकरी मेळावा १३ सप्टेंबर रोजी मा.श्री. अर्जुनराव खोतकर माजी राज्यमंत्री तथा मुख्य प्रशासक कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यावेळी बंजारा महिला यांनी त्यांचे पारंपारिक पेहराव्यामध्ये उपस्थित राहुन मा. अर्जुनराव खोतकर यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीन योजने बाबत तयार केलेल्या गाण्यावर नृत्य करत कार्यक्रमाची शोभा वाढवीली. यावेळी मा. श्री. अर्जुनराव खोतकर यांना फेटा बांधुन तसेच बंजारा होळी पट्टा घालुन सत्कार बाजार समितीचे सचिव मोहन राठोड व अंकुश राठोड यांनी केला तसेच सौ. सिमा खोतकर यांचा सौ. सविता राठोड यांनी सत्कार केला.

या प्रसंगी अर्जुनराव खोतकर यांनी भाषण पर बंजारा समाज हा कष्टकरी समाज असुन बंजारा समाज हा खुप मोठा समाज असुन मागील काही




काळा पासुन या समाजाने खुप मोठ्या प्रमाणावर प्रगती केलेली आहे. आज ब-याच मोठ्या पदावर व उद्योग/व्यापार क्षेत्रात नामवंत नावे हे बंजारा समाजाच्या बांधवाचे आहे. बंजारा समाजाला यापुढे आवश्यक असणा-या सुविधा पुरविणे बाबत माझ्या कडुन तसेच बाजार समितीकडुन जास्तीत जास्त देता येईल तेवढ्या सुविधा देण्याचा व त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न मी करेल. पोहरादेवी येथे मदत म्हणुन मुख्यमंत्री यांनी ७०० कोटी रुपये विकास कामासाठी मंजुर करण्यात आलेले असुन नंगारा भवनाचे काम हे पुर्णत्याला आले असुन लवकरच त्याचे लोकार्पण करण्यांत येईल व मी खंबीर पणे बंजारा समाजाच्या पाठीशी आहे असे आपल्या भाषणातुन त्यांनी आपले व्यक्तव्य व्यक्त केले. सह बंजारा समाजाचे सर्व श्री उध्दव पवार, प्रकाश चव्हाण, परसरराम राठोड, जयकुमार राठोड, अंकुश राठोड, शेषराव पवार, गुलाब चव्हाण, मुरलीधर चव्हाण, शेषराव चव्हाण, रंगनाथ आढे, वामन आढे, यावेळी सौ. योगिता संजय खोतकर, सौ. रचना चक्रधर खोतकर व सौ. अमृता ज्ञानेश्वर डोंगरे यांच्या डॉ. ओंकार राठोड, डॉ.बी. बी. चव्हाण, डॉ. विजय राठोड, प्रा. रमेश राठोड, प्रा. दत्तु चव्हाण, मुरलीधर जाधव, मोहनजी राठोड निवृत्त सब रजिष्टार, धन्नु गायके सरपंच पाथुड, छगन किटाळे, गोरख पवार तसेच बंजारा समाजाचे मॉक्यातील आडते, खरेदीदार सिताराम पवार, संजय राठोड, राजु राठोड, गजानन पवार, अनिल चव्हाण, गजानन आढे यांच्या सह समाजातील समज बांधवाची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती सदर कार्यक्रमाचे आयोजन हे मयुरेश्वर ट्रेडींग कंपनीचे भागीदार बाळु शिंदे यांनी केले. रेशीम अधिकारी मोहिते साहेब यांनी रेशीम शेती बाबत सविस्तर माहिती शेतकरी मेळ्यातील उपस्थित शेतक-यांना दिली. यावेळी बाजार समितीचे संचालक संतोष मोहिते, माजी संचालक अनिल सोनी, रमेश तोतला व्यापारी हुकुमचंद पाटणी, निवृत्ती पाचकुले, विरेंन्द्र रुणवाल, रामेश्वर बोडखे, गोविंद सराटे, प्रदीप गवारे, सुनिल गोयल, अशोक पाचफुले, संजय कानडे, अरुण तापडीया, सुशिल गौड तसेच बाजार समितीचे सचिव श्री. मोहन राठोड, सहा. सचिव अनिल खंडाळे, भगवान शिंदे, भरत तनपुरे, लेखापाल अजय मिरकड, अशोक कोल्हे, निरिक्षक शिवानंद पालवे, प्रसाद काकडे, संजय जाधव, अभियंता हार्दिक फलके, प्रफुल हिवरेकर, कैलास चव्हाण, वसंत निकम, रोहिदास बिल्लोरे, कैलास परकाळ यांच्या सह व्यापारी, आडते, हमाल, मापाडी, शेतकरी यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## थोडक्यात



### परशुराम जाधव यांनी घेतली उद्धव ठाकरेंची भेट

बीड -जिल्हा संपर्कप्रमुख पदावर निवड झाल्यानंतर दिनांक १३ सप्टेंबर रोजी परशुराम जाधव यांनी मातोश्रीवर जाऊन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे सचिव तथा खासदार अनिल देसाई, शिवसेना नेते विधिमंडळ प्रतोद सुनीलप्रभू, शिवसेना नेते आमदार अनिल परब यांच्या सोबत आशिर्वाद घेतले व बीड जिल्हा दौ-याचा अहवाल सादर केला. यावेळी पक्षप्रमुखानी पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### धर्मापुरी येथे शादीखाना बांधकामास १ कोटी रुपये निधी मंजूर

परळी : परळीचे आमदार तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या मतदारसंघातील धर्मापुरी येथील ग्रामस्थांना दिलेला शब्द पूर्ण केला असून, धर्मापुरी येथे शादीखाना उभारण्यास शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाने मंजुरी दिली असून, मुंडेंच्या मागणीनुसार या कामासाठी एक कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. धनंजय मुंडे यांनी मतदारसंघात दिलेले शब्द पूर्ण करण्यावर व पायाभूत सुविधांच्या निर्माणवर अगदी सुरुवातीपासूनच भर दिला आहे. मागील सुमारे पावणे पाच वर्षांच्या कार्यकाळात ग्रामीण भागात तीर्थक्षेत्र विकास, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, पशु वैद्यकीय दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय येथे विविध सुविधा, राष्ट्रीय महामार्गाचे नावन्यपूर्ण निर्माण, शहर बायपास यांसारखी अनेक कामे पूर्ण केली आहेत. त्यातच आता दिलेला शब्द पूर्ण करत धर्मापुरी येथील शादीखान्याचीही भर पडली आहे. याबद्दल धर्मापुरीचे ज्येष्ठ नेते ऍड.गोविंद फड व ग्रामस्थांनी धनंजय मुंडे यांचे आभार मानले आहेत.

### रक्तदान शिबिरात ४० रक्तदात्यानी केले रक्तदान

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील मठ गल्ली येथील संभाजी गणेश मंडळ यांनी सामजिक उपक्रम म्हणून विविध स्पर्धेचे आयोजन केले आहे त्यात संगीत खुर्ची,नृत्य स्पर्धा गितगायन स्पर्धा,गौरी महालक्ष्मी सजावट,प्रश्नमंजुषा,लहान मुलांसाठी क्रिकेट स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा त्याच बरोबर मोफत महाआरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर याचे दि.१३ वार शुक्रवार या दिवशी आयोजन केले होते आरोग्य शिबिराचे उदघाटन तुकाराम येवले यांच्या हस्ते करण्यात आले तसेच रक्तदान शिबिराचे उदघाटन इम्रान खान यांच्या हस्ते करण्यात आले आरोग्य शिबिरात ८२ रुग्णांच्या वेगवेगळ्या तपासण्या करण्यात आल्या तसेच आरोग्य तपासणी डॉ.रुद्रवार यांनी केली रक्तदान शिबिरात ४० रक्तदात्याणी रक्तदान केले शिबिर व्यवस्थित रित्या पारपाडण्यासाठी विनोद कुल्थे,बाळासाहेब झिंजूरके,पुरुषोत्तम आंबीलवादे सर्व स्पर्धेचे प्रमुख सुरज गवरकर,मंडळाचे अध्यक्ष मंगेश आवटे,सचिन सरवदे,केशव रत्नपारखी,रामा हिंगण,नितीन शेटे,राहुल भागवत,अशोक डांगे,संतोष रुद्राक्ष,भागवत गिरी,श्रीकांत झिंजूर्के,प्रदीप कुलकर्णी,प्रथमेश लांडगे,अभिषेक झिंजुरके,अवधूत झिंजुर्के,भगवान गिरी,कृष्णा झिंजुर्के,सौरभ चूर्णे तसेच मंडळाचा सर्व सदस्यांचे मोलाचे योगदान राहिले...!



जालना : ओम साई राम ग्रुपतर्फे जालना श्री अनोखा गणेश मंडळाच्या बाप्पाची महाआरती करण्यात आली. याप्रसंगी राजेंद्र भारुका, दिनेश भारुका, निलेश भारुका, लोकेश भारुका, दीपक भारुका, रितेश भारुका, आदर्श भारुका, यांच्यासह परिवारातील सर्व सदस्य होते .

## १५ वर्षापासून प्रलंबित असलेले शेतरस्ते 'समृद्धी'ने केले दुरुस्त

अंबड । प्रतिनिधी

गेल्या पंधरा वर्षापासून शेकडो शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असलेला अंबड तालुक्यातील धाकलगाव ते नावडे वस्ती व घनसावंगी तालुक्यातील हरसिंग नाईक तांडा ते राणी उंचेगाव हा शेत रस्ता नादुरुस्त होता. वारंवार हे रस्ते दुरुस्त करण्याची मागणी शेतकरी करत होते. परंतु त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. पाच वेळा स्थानिक आमदाराने या रस्त्यावर नारळ फोडले पण काम काही केले अन्ही. शेवटी समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी स्वखर्चातून हे दोन्ही रस्ते शुक्रवारी तयार करायला सुरुवात केली. यामुळे दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी सतीश घाटगे यांचे आभार मानले..

घनसावंगी तालुक्यातील हरसिंग नाईक तांडा ते राणी उंचेगाव हा रस्ता नादुरुस्त असल्याने येथील शाळकरी मुलांना शाळेत जाता येत नव्हते. तसेच शेतकऱ्यांना शेतात जाणे जिकरीचे बनले होते. अशीच स्थिति धाकलगाव ते नावडे वस्ती या रस्त्यामुळे दाखल गाव येथील शेतकऱ्यांची होती या दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी सतीश घाडगे यांची भेट घेऊन हे रस्ते दुरुस्त करून देण्याची मागणी दोन दिवसापूर्वी केली होती. या मागणीची तात्काळ दखल घेऊन सतीश घाटगे यांनी या दोन्ही रस्त्याचे काम स्वखर्चातून सुरू केले अगोदर काम सुरू करून नंतर या रस्त्याचे उद्घाटन त्यांनी केले. यावेळी दोन्ही गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक वर्षापासूनची मागणी दोन दिवसात पूर्ण केल्यामुळे सर्व शेतकरी आनंदी झाले. त्यांनी सतीश घाटगे यांचे आभार मानले.

## एक सण- एक वृक्ष, आणि एक पेड माँ के नाम उपक्रमामध्ये सहभागी व्हा

### नगराध्यक्ष जिया बेग आणि मुख्याधिकारी ऋतुजा पाटील यांचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

माझी वसुंधरा अभियान आणि " स्वच्छता हीच सेवा " २०२४ या अभियाना अंतर्गत श्रीगणेशोत्सव आणि ईद-ए -मिलाद या पवित्र कालावधीतील पर्वा वर आष्टी नगरपंचायत कार्यालयाच्या वतीने आष्टी शहरांमध्ये स्वच्छता हीच सेवा, एक सण-एक वृक्ष आणि एक पेड माँ के नाम हे उपक्रम सुरू करण्यात आले असून आष्टी शहरातील पर्यावरण संवर्धन करून आष्टीतील नागरिकांचे जीवन अधिक सुंदर बनवण्यासाठी या उपक्रमामध्ये आष्टी शहरातील नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आष्टी नगरपंचायत चे नगराध्यक्ष जिया बेग आणि नव्याने पदभार स्वीकारलेल्या मुख्य अधिकारी ऋतुजा पाटील यांनी केले आहे.

आष्टी नगरपंचायत प्रसिद्धीपत्रकाद्वारे त्यांनी याबाबत माहिती दिली याबाबत अधिक माहिती देताना मुख्य अधिकारी ऋतुजा पाटील म्हणाल्या की आष्टी नगरपंचायत च्या वतीने वृक्षारोपण उपक्रम राबवण्यात येणार आहे दिनांक ११ सप्टेंबर २०२४ रोजी नगराध्यक्ष जिया बेग आणि आपल्या वतीने आष्टी शहरातील पेठ गणेश मंडळासह पाच प्रतिनिधिक स्वरूपामध्ये गणेश मंडळांना प्रत्येकी पाच वृक्ष लागवडीसाठी सप्रेम भेट देण्यात आले असून या गणेश मंडळांनी त्याची संवर्धन करावे अशी अपेक्षा आहे त्याचबरोबर एक सण एक झाड आणि एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत श्री गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद या धार्मिक परवावर प्रत्येक घरी वृक्षारोपण करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

शहरातील पर्यावरण समतोल राहण्यासाठी आणि निसर्गरम्य वातावरणामध्ये आनंददायी जीवन जगता यावे यासाठी उपक्रम आयोजित करण्यात आला असून आष्टीकर नागरिकांनी जास्तीत जास्त या अभियानामध्ये सहभागी होऊन जास्तीत जास्त वृक्ष लागवड व्हावी असा आमचा प्रयत्न असे आहे असे मुख्याधिकारी यांनी सांगत त्यापुढे म्हणाले की, १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन ते २ ऑक्टोबर या कालावधीमध्ये स्वच्छता हीच सेवा या उपक्रमांतर्गत देखील आष्टी शहरामध्ये जास्तीत जास्त वृक्ष लागवडीचा आमच्या संकल्प आहे. नागरिकांना वृक्ष लागवडीसाठी रोपांचा पुरवठा नगरपंचायत कार्यालयाद्वारे करण्यात येणार आहे. मागणीप्रमाणे त्यांना रोपे पुरवण्यात येतील असे सांगत या उपक्रमामध्ये सर्वांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.यावेळी नगराध्यक्ष जिया बेग उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, गटनेते किशोर झरेकर कार्यालयीन अधीक्षक प्रकाश हारकळ नगर अभियंता अथहर बेग,नगर अभियंता गहिनीनाथ शिरसाठ,शशांक मिसाळ,नागेश करांडे,दिलीप निकाळजे,संजय निकाळजे,गणेश कुलकर्णी,सोमनाथ साखरे,श्रीकांत भोज, श्रीकांत धोंडे,बाळू धोंडे हे उपस्थित होते.

## आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर येथे आज हृदयरोग व मधुमेह निदान शिबीर

बीड । प्रतिनिधी

जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहू बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी डायग्नोस्टिक सेंटर येथे रविवार १५ सप्टेंबर. २०२४ रोजी सकाळी ११ ते ३ या वेळेत प्रसिध्द हृदयरोग व मधुमेह तज्ञ डॉ.अनिकेत कटारीया हे हृदय रोग व मधुमेह रुग्णांची तपासणी करणार आहेत.सध्या पावसाळ्याची चाहुल सुरु झाली असून हृदय रोग व मधुमेह असणार्यांव रुग्णांना याचा त्रास होऊ शकतो. तसेच छातीत दुखणे, छाती जड वाटणे, घाम येणे, दम लागणे, चक्कर येणे यासाठी तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील व पंचक्रोषीतील रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या विश्वस्तांनी केले आहे.

या शिबीरात संपूर्ण बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, हृदयातील छिद्र बुजवणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया व अँजियोप्लास्टी इत्यादीवर निदान करण्यात येणार आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. शिबीरात हृदयरोग तज्ञ व मधुमेह तज्ञ डॉ. अनिकेत कटारिया व तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल रुग्णसेवेमध्ये राज्यामध्ये सुप्रसिध्द आहे. आज पर्यंत १४ हजार ओपन बायपास सर्जरी, ४० हजारापेक्षा अधिक एन्जोप्लास्टी, १ लाख २५ हजारापेक्षा एन्जोग्राफी, विविध क्षेत्रामध्ये वैद्यकीय उपचारामध्ये आग्रगण्य आहे. डोळ्याचे १ लाख मोतिबींदू शस्त्रक्रिया अशा विविध आजारांवर रुग्णांची सेवा करण्याचा उच्चांक केलेला आहे. १ हजार ३०० पेक्षा जास्त कर्मचारी, विविध फिल्डमध्ये २५० पेक्षा अधिक डॉक्टर सेवा करत आहेत. हृदयरोग व मधुमेह शिबीरात तपासणी करण्यासाठी नोंदणी फीस केवळ १०० रुपये ठेवण्यात आलेली आहे. वेळे अभावी नोंदणी करु न शकलेल्या रुग्णांची देखील तपासणी करण्यात येणार आहे. नोंदणीसाठी मो. ८२६२००९०९१ यावर संपर्क साधावा. रविवारी सकाळी १५ सप्टेंबर ११ ते ३ या वेळेत, अहमदनगर येथील तज्ञ डॉक्टर येवून रुग्णांची तपासणी करणार आहेत. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे. तरी बीड शहरातील व पंचक्रोषीतील हृदयरोग व मधुमेह रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन बीड शहरातील सर्व सकल जैन समाजाच्यावतीने करण्यात आले आहे. तसेच या सेंटरमध्ये जनरल ओपीडी, मेडिकल सुविधा, सिटीस्कॅन, एक्सरे, रक्त व लघवी तपासणी अल्प दरात केल्या जातात तरी रुग्णांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.

## ॲड. नरसिंह जाधव यांचा आष्टी तालुक्यात झंजावात

पाटोदा । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे विधी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष आणि शरद पवारांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे आणि आष्टी विधानसभेचे इच्छूक उमेदवार ॲड. नरसिंह जाधव यांचा आष्टी तालुक्यातील गावागावांत उत्सूर्फतपणे लोक स्वागत करीत असल्याने ॲड. जाधव यांनी सलग आष्टी तालुक्यातील गावांमध्ये संपर्क दौरा सुरु ठेवला आहे. यावेळी लोक आम्हाला आता मतदारसंघात नवीन नेतृत्वाची गरज असल्याचे बोलून दाखवित असून, आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा विश्वास देत असल्याने, ॲड. जाधव यांच्या झंजावात आष्टी तालुक्यात सुरु असून, मतदारसंघातील गावोगावच्या पारावर, हॉटेल-टपर्यावर सर्वत्र लोक जाधव यांच्याच नावाची चर्चा होऊ लागली आहे.

ॲड. जाधव यांनी आष्टी तालुक्यातील किन्ही, बेलगाव, डोईठान, बीड सांगवी, गांधनवाडी, जोगेश्वरी पारगाव, टाकळसिंग, खेडकर सांगवी, हरिनारायण आष्टा, आष्टा आदी गावांत जाऊन लोकांशी थेट संपर्क साधला. यावेळी ग्रामस्थांकडूनही त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात येत असून, एनकांनी तर प्रस्थापित नेतृत्वाविरुध्दची नाराजी व्यक्त करुन आता मतदारसंघाला नव्या नेतृत्वाची गरज असल्याचे बोलले जात आहे. मराठा समाजातील सामान्य घरातील उमेदवार म्हणून ॲड. जाधव यांच्याकडे पाहिले जात असल्याने यावेळी आष्टी मतदारसंघात नक्की परिवर्तन घडेल असे ज्येष्ठ पवारांना मानणारे कार्यकते बोलून दाखवित आहेत. यावेळी आष्टा येथील शशिकांत कन्हेरे यांची संभाजी ब्रिगेड बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी मौजे चिंचपूर ता. आष्टीचे सरपंच सतीश ढवळे, राष्ट्रवादी पक्षाचे आष्टाचे गटाचे गण प्रमुख चेअरमन चंद्रकांत गळगटे आदी उपस्थित गावकर्यांशी तालुक्यातील विविध सामाजिक राजकीय विषयांवर चर्चा करण्यात आली.

## कर्जमाफी,दूषित पाण्यासाठी शेकापचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील एनएसएल शुगर्स कारखान्याने मळीचे दूषित व विषारी पाणी माजलगाव धरणाच्या मुख्य पाटात सोडल्याने पावसामुळे ते पाणी माजलगाव तालुक्यातील खरात आडगाव, पवारवाडी, शिंपेटाकळी, रोशनपुरी, नागडगाव, सांडस चिंचोली, छत्र बोरगाव, आबेगाव, मोठीवाडी, छोटीवाडी, गंगामसला, रामनगर सोमठाणा, सरवर पिंपळगाव, आडोळा, निपाणी टाकळी, सोन्नाथडी , गुंजथडी, सुरुमगाव, शुक्लतीर्थ लिमगाव, मोगरा आदी गावच्या नदी, ओढे,विहिर, बोरवेल, पाटासह गोदावरी नदीत दूषित व विषारी पाणी आढळून येत आहे, याशिवाय गाई म्हशी, शेळ्यांना गर्भाशयाचे व इतर आजार जडले आहेत तर अनेक गावच्या कुत्र्यावर विषारी पाण्याचा विपरीत परिणाम झाला असून त्यांचे मानसिक संतुलन बिघडून पिसाळण्याचे प्रकार वाढत आहेत.

याशिवाय अनेक गावातील नागरिकांच्या



आजाराचे मुख्य कारण हे पाणी ठरत असल्याने मनुष्यासह पशुधन धोक्यात आले असून मनुष्यासह पशुधनाच्या जीविताशी खेळणाऱ्या एनएसएल शुगर्स कारखान्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून एनएसएल शुगर्स कारखान्याचा गाळप परवाना रद्द करण्यात यावा, याशिवाय शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करण्यात यावे, शेतकऱ्यांना सरसकट २०२० चा पिक विमा देण्यात यावा, शेतकऱ्यांना सरसकट २०२३ चा पिक विमा व अनुदान देण्यात यावे, २०२४ चा २५% अग्रीम सरसकट देण्यात यावा, शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित किफायतशीर हमीभाव देण्यात यावा, या मागण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे वतीने गंगामसला येथे २० सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन शेतकरी कामगार पक्षाचे नेते मध्यवर्ती समिती सदस्य भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली दिले असून सदर निवेदनावर भाई मुंजा पांचाळ, भाई राहुल सोळंके, भाई सतीश शेजुळ,भाई अशोक कुलकर्णी, भाई अनंत चव्हाण, लक्ष्मण आप्पा चव्हाण, गोविंद आढाव,भरत सोळंके, अभिषेक सोळंके, कृष्णा आसाराम सोळंके, सुशिल हांडे, नुमान भाई चाऊस, संभाजी पाष्टे, भाई माऊली चंदनशिव भाई सुदाम चव्हाण, भाई उल्हास घाटूळ, भाई चांगदेव शेजुळ, भाई भास्कर कांबळे, भाई राजेभाऊ शेरकर, राधाकृष्ण इंगळे, भगवान रोकडे ,मारुती खेत्री, नाथाभाऊ किनोळकर, अशोक नाना पाष्टे, विठ्ठल खेत्री, संभाजी चव्हाण आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## बीईओ पिकवणे, विस्तार अधिकारी सुळे यांच्यासह केंद्रप्रमुख व मुख्याध्यापकांचा नोटिसा

### कर्तव्यात कसूर वा हलगर्जीपणा भोवला

बीड । प्रतिनिधी

पाटोदा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी कैलास पिकवने, विस्तार अधिकारी रामचंद्र सुळे, डोंगरकिनी केंद्राचे केंद्रप्रमुख जि.पी. सोंडगे आणि डोंगरकिन्ही येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक घायाळ बबन रामकिसन यांना बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्याचा भंग आणि विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून न दिल्यामुळे सदर अधिकारी आणि मुख्याध्यापकाविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे.

या संदर्भात पाटोदा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी के.आर. पिकवणे यांना दिलेल्या नोटीस मध्य म्हटले आहे की, गटशिक्षणाधिकारी कार्यालय येथिल कामकाज पाहत असताना डोंगरकिन्ही येथील शाळेला कौशल्य विकास रोजगार उद्योग व नाविन्यता विभागाच्या शासन निर्णयानुसार बीएससी बीएड या शैक्षणिक पात्रतेचे पद न भरताना मुख्याध्यापकांना मार्गदर्शन केले नाही. बीड जिल्हा परिषदेवर दि.१२ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांना येण्यास भाग पाडून विद्यार्थ्यांच्या जीविकास धोका निर्माण करणे, शासकीय कामात जाणीवपूर्वक निष्काळजीपणा करणे, वरिष्ठाच्या आदेशाचे पालन न करणे, शिक्षण हक्क कायद्याचा भंग करणे, शौचालयाची सुविधा आहे किंवा नाही? याबाबत अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर न करणे तसेच उघड्यावर सौच्यास बसण्यास भाग पाडणे, विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात गोंधळ घातल्याने जिल्हा परिषदेची प्रतिमा जनमानसात मलीन करणे, विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद बीड येथे आणून प्रशासनास वेठीस स्? धरणे, आदीसह अनधिकृत रजेवर राहणे तसेच वारंवार रजेवर जाऊन महाराष्ट्र नागरी सेवा वर्तवणूक नियम १९७९ मधील नियम ३ चा भंग करणारी कृती केल्यामुळे शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये? याबाबतची नोटीस देण्यात आली आहे. पाटोदा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी सुळे आर.एस. यांनाही वरिष्ठाच्या आदेशाचे पालन केले नाही.

शाळाभेटी केल्या नाहीत. विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी बाबत योग्य निर्णय घेणे, विद्यार्थ्यांना मूलभूत भौतिक सुविधा उपलब्ध आहेत किंवा नाही? याबाबत खात्री करून वरिष्ठ कार्यालयाला कळविले नाही. बालकांचा व मोफत शिक्षणाचा हक्क कायद्याचा भंग व कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा वर्तणूक नियम १९६७ मधील नियमाचा भंग करणारी कृती असल्यामुळे शिस्त व अपील नियम १९६४ नुसार शिस्तभंगाची कारवाईची नोटीस देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे डोंगरकिन्ही जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक बबन रामकिसन घायाळ आणि केंद्रप्रमुख जी.टी. सोंडगे यांनाही नोटीस देऊन शासकीय कामात निष्काळजीपणा केल्याप्रकरणी आणि शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ चा भंग केल्याप्रकरणी तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक व भौतिक मूलभूत सुविधा उपलब्ध करून न दिल्या प्रकरणे नोटीस देऊन कारवाई कारवाई करण्याची तंबी देण्यात आली आहे.

राज्य लोकतंत्र
रविवार दि.१५ सप्टेंबर २०२४ | ६

# चला हवा येऊद्या च्या टीमने परळीकरांना भरभरून हसवले

## धनंजय मुंडेंच्या नाथ प्रतिष्ठानद्वारे आयोजित वैद्यनाथ गणेश महोत्सवात हाऊसफुल गर्दी!

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

ना. धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवाच्या सातव्या दिवशी सायंकाळी झी मराठी वाहिनीवरील चला हवा येऊ द्या या प्रसिद्ध हास्य कार्यक्रमातील विनोद वीरांनी प्रसिद्ध विनोदी प्रहसने सादर करून परळीकरांना भरभरून हसवले.




प्रसिद्ध हास्य कलाकार भारत गणेशपुरे, सागर कारंडे, गौरव मोरे, श्रेया बुगडे, हेमांगी कवी, कुशल बद्रिके यांच्यासह प्रसिद्ध गायक दर्शन साटम, अभिनेत्री स्मिता गोंदकर यांसह विविध कलाकारांनी हास्य प्रहसने तसेच विविध गीते सादर केली.

नाथ प्रतिष्ठान च्या वतीने आयोजित या गणेशोत्सवात दररोज एकापेक्षा एक दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जात असून परळीकरांचा तसेच आजूबाजूच्या तालुक्यातील नागरिकांचा सुद्धा याला भरभरून प्रतिसाद मिळत असून अगदी शेवटच्या क्षणापर्यंत हाउसफुल गर्दी पाहायला मिळत आहे.

कार्यक्रमापूर्वी परळी शहरातील ज्येष्ठ व्यापारी बांधवांच्या हस्ते श्रींची आरती करण्यात आली. तसेच कार्यक्रमानंतर सर्व पाहुण्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन आर जे अक्षय यांनी केले.

# जय हिंद गणेश मंडळाच्या वतीने ५५ युवकांचे रक्तदान

**चौसाळा । प्रतिनिधी**

येथील जय हिंद गणेश मंडळाच्या वतीने श्री गणेश उत्सवात अग्रेसर असलेल्या जय हिंद गणेश मंडळ यांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे विशेषता समाज प्रबोधक व राष्ट्रीय कार्यक्रम या मंडळाच्या वतीने व ग्रामस्थांच्या सहकार्याने गावातील ५५ युवकांनी आपले रक्तदान देऊन राष्ट्रीय कार्यक्रमात आपला सहभाग नोंदविला चौसाळा येथील जय हिंद गणेश मंडळ दरवर्षी गणेश उत्सव कार्यक्रमात विविध कार्यक्रम आयोजन करून समाज प्रबोधन करता त्याचप्रमाणे दिनांक १४ ९ २०२४ रोजी शनिवारी गावातील मान्यवर डॉक्टर, पत्रकार,शेतकरी यांच्यासह व्यापारी क्षेत्रातील मान्यवरासह ५५ युवकांनी आपला सहभाग नोंदविला. चौसाळा येथील डॉ. हनुमंत निनाळे सहकार्यातून शासकीय रुग्णालयातील विनय कुमार, संतोष गायकवाड, दिलीप वरसमल



या कर्मचाऱ्यांनी या शिबिरात कार्य केले. या आयोजित केलेल्या भव्य शिबिरात डॉ. भीमराव पोकळे यांच्यासह गणेश मंडळाचे अध्यक्ष आकाश काळे, उपाध्यक्ष कुंदन निनाळे, सचिव तेजस वाघमारे, कोषाध्यक्ष गणेश वाघमारे आणि आदित्य निनाळे सदस्य अभिजीत खतीले, कृष्णा चौधरी, उदय निनाळे, राजेश चौधरी, कृष्णा निनाळे , अभी पवार, संकेत निनाळे, रमेश निनाळे , तुषार वाघमारे, प्रतीक कळसकर यांच्यासह आदी युवक कार्यकर्त्यांनी भाग घेतला.

# न्याय व हक्कासाठी ताकदीने शक्ती प्रदर्शन करा:पप्पु कागदे

माजलगाव । प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले शोषित, वंचित, उपेक्षित समूहातील समाज बांधवांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी राज्यसह देशभर रिपाइंच्या माध्यमातून त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी विविध आंदोलनाच्या माध्यमातून संघर्ष करीत आहेत.

संघर्षशील व कर्तव्यदक्ष नेतृत्वाचा यथोचित सन्मान करण्यासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने दि.५ ऑक्टोबर रोजी बीड शहरात केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची तिसऱ्यांदा केंद्रीय मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल भव्य नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे. या भव्य नागरिक सत्कार सोहळ्याच्या



पूर्वतयारीसाठी आयोजित माजलगाव तालुका कार्यकारिणीच्या बैठकीत युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी रिपाइं कार्यकर्त्यांनी न्याय व हक्कासाठी संघटीत होऊन ताकतीने शक्तिप्रदर्शन करावे असे आवाहन केले.

यावेळी राजू जोगदंड, अविनाश जावळे,भगवान ससाने, प्रभाकर चांदणे, किशोर जावळे,राजू तुपारे, गणेश लांडगे, ओम पान ३ वर

# चंपावती सम्राज्ञी होम मिनिस्टरमध्ये महिला भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे –सौ.जयश्री विधाते

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील महिला भगिनींच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून आम्ही काही दिवसांपूर्वी माजी मंत्री जयदत्तजी आण्णा क्षीरसागर साहेब यांच्या कडे होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी या खेळ पैठणीचा उपक्रमाची संकल्पना मांडली होती. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत काकु–नाना प्रतिष्ठान द्वारा होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या खेळासाठी विनामूल्य प्रवेश दिला जाईल. या कार्यक्रमाला प्रथम फेरीसाठी निवेदक म्हणून आपल्या बीडचे सुरेश साळुंके तर अंतिम फेरीसाठी निवेदक क्रांती





माळेगावकर हे लाभले आहेत.

बीड शहरातील सर्व भागातील भगीनींना सहभागी होता यावे म्हणून प्रभाग स्तरावर शहरातील विविध ठिकाणी प्रथम फेरीचे आयोजन करण्यात येईल या फेरीतील विजेत्या तीन स्पर्धकासह अंतिम सात अशा दहा स्पर्धकांना अंतिम फेरीत प्रवेश दिला जाईल. प्रभाग स्तरावर ही प्रथम विजेत्याला पैठणी द्वितीय विजेत्याला इमिटेशन ज्वेलरी आणि तृतीय विजेत्याला आकर्षक चौरंग असे बक्षिसाचे स्वरूप असेल तर उर्वरित सात स्पर्धकांना आकर्षक गिफ्ट दिले जातील. या प्रथम फेरीतून निवड झालेल्या दहा जणी अंतिम फेरीसाठी पात्र ठरतील. अंतिम फेरीचा कार्यक्रम शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी पारस नगरी माने कॉम्पलेक्स समोर बीड येथे दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

पान ३ वर

# जनजागृती रॅलीने वेधले धारूरकरांचे लक्ष,महापुरुषांच्या वेशभूषेत बालगोपाळ

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

शहरातील शिवगर्जना गणेश मंडळाच्या सामाजिक उपक्रमांतर्गत आज दिनांक १४ सप्टेंबर रोजी भव्य दिव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये बालगोपाळांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन विविध महापुरुषांच्या वेशभूषणे धारूर करांचे लक्ष वेधले.

धारूर शहरात मोठ्या आनंदात व उत्साहात गणेश उत्सव सुरू आहे विविध सामाजिक उपक्रम ही मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत यातच शिवगर्जना गणेश मंडळाने सामाजिक सलोखा, पर्यावरण रक्षण, पान ३ वर




# कर्नाटकातील चेंडे ढोल पथकाने जिंकली आष्टीकरांचे मने

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आमदार बाळासाहेब आजबे मित्र मंडळ शिवशंभो गणेश मंडळाच्या वतीने सातव्या दिवशी भव्य पारंपारिक पद्धतीने गणेश विसर्जन मिरवणूक संपन्न झाली या मिरवणुकीमध्ये कर्नाटक येथील चेंडे ढोल व नृत्य पथकाने यावेळी आष्टीकरांची मने जिंकले

आष्टी येथे आमदार बाळासाहेब आजबे मित्र मंडळाच्या वतीने शिवशंभो गणेश मंडळाची स्थापना करण्यात येते या गणेश मंडळाची विसर्जन मिरवणूक सातव्या दिवशी आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या उपस्थितीमध्ये हजारो गणेश भक्तांच्या सहभागाने मोठ्या उत्साहात पार पडली





यावेळी पारंपारिक पद्धतीने गणेश विसर्जनाची मिरवणूक काढण्यात आली होती यामध्ये हलगी पथक अहमदनगर येथील १०० मुले –मुलींचे गणांत ढोल पथक व खास आकर्षण म्हणून कर्नाटक राज्यातील प्रसिद्ध चेंडे ढोल व नृत्य पथक आमंत्रित करण्यात आले होते यावेळी चेंडे पथकाने आष्टी शहरांमध्ये ढोल पथकाच्या वाद्यावर नृत्य करत आष्टीकरांची मने जिंकली, आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या हस्ते श्री गणेशाच्या मूर्तीची अद्यावत पूजा करून आरती करण्यात आली व सायंकाळी पाच वाजता मिरवणुकीस सुरुवात करण्यात आली यावेळी आष्टी शहरातील किनारा चौक येथे वेगवेगळ्या पद्धतीच्या आकर्षक रांगोळी काढण्यात आल्या होत्या या रांगोळीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले या मिरवणुकीसाठी आष्टी तालुक्यातून हजारोंच्या संख्येने गणेश भक्त उपस्थित होते मिरवणूक मोठ्या उत्साहामध्ये व शांततेत पार पडली.

# अवैध धंदे करणाऱ्यांवर अंभोरा पोलीसांची यशस्वी पकड

## अवैध धंद्यांविरोधात अंभोरा पोलिसांच्या ५५ सिंघम कारवाया

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिसांनी मागील आठ महिन्यांत अवैध दारूसह जुगार विरोधी ५५ कारवाया करण्यात आल्या असून सुमारे १७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. अंभोरा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मंगेश साळवे यांनी पदभार स्वीकारल्यापासून अवैध धंदे करणाऱ्यांची दानदिन घडलेली दिसून येत आहे आठ महिन्यांत अवैध दारू विरोधात ५० तर ५ जुगारविरोधी कारवाया केल्या. एकूण ५५ कारवायांमध्ये १७ लाख १४ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अवैध धंद्यांना चाप बसावा यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई ऑगस्ट २०२४ अखेरपर्यंत मागील वर्षाच्या तुलनेत १३८ केसेस जास्त केल्या आहे. अंभोरा पोलिस ठाण्याच्या वतीने नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी विविध उपक्रम सुरू आहेत. गुन्ह्यांना आळा बसावा यासाठी मागील महिन्यांपासून पोलिस दररोज नाईट राउंडला जात आहेत. माहितीगार गुन्हेगार, हिस्ट्री शीटर, तडीपार यांची घरी जाऊन तपासणी केली जात आहे. पान ३ वर

### गुन्हेगार हा जन्मताच गुन्हेगारी


वृत्तीचा नसतो तो परिस्थिती अभावी बनतं असतो त्यांचा तिरस्कार करण्यापेक्षा त्यांना कसं सुधरवता येईल हा विचार प्रत्येक पोलिस कर्मचाऱ्यांनी करावा व जनतेच्या मनात पोलिसांबद्दल भिती नव्हे तर आदर असायला हवा कारण पोलिस म्हणजे दुसरं तिसरं कोणी नसुन तु आपल्याला न्याय देत गुन्हेगारापासुन सर्वसामान्य वाचवतो.



–सपोनि मंगेश साळवे, अंभोरा पोलिस स्टेशन

# धारूर बस स्थानकात महिला प्रवाशांची गैरसोय

## स्वच्छताग्रह, हिरकणी कक्ष नावालाच



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर बस स्थानकात महिला प्रवाशांसाठी बांधण्यात असलेल्या स्वच्छतागृहाचे बांधकाम पूर्ण झाले असूनही अद्याप स्वच्छताग्रह सुरू करण्यात आले नाही त्यामुळे बस स्थानकात येणाऱ्या महिला प्रवाशांची व विद्यार्थिनींची गैरसोय होत आहे.

धारूर बस स्थानक म्हणजे समस्या चे माहेरघरच आहे बस स्थानक प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे बस स्थानकाच्या परिसरात

पान ३ वर

### स्थानकातील हिरकणी कक्षात सुविधांचा आभाव

बस स्थानकात येणाऱ्या महिला प्रवाशांना आपल्या लहान मुलांना स्तनपान करण्यासाठी महामंडळाकडून बस स्थानकामध्ये हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आले आहे धारूर बस स्थानकामधील हिरकणी कक्षामध्ये कुठल्याही सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांना मुलांना स्तनपान करण्यासाठी अडचणी चा सामना करावा लागत आहे आगार प्रमुखांनी बसस्थानकातील हिरकणी कक्ष सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्या व महिलांना होणारा मनस्ताप थांबवावा.

**बस स्थानकामध्ये असलेला हिरकणी कक्षात कुठल्याही सोयी सुविधा उपलब्ध नाहीत हिरकणी कक्ष सर्व सोयी सुविधा युक्त बनवावा व बस स्थानक परिसरातील नव्याने बांधण्यात आलेले स्वच्छालय सुरू करावे व महिलांची गैरसोय टाळावी, सुविधा उपलब्ध न झाल्यास आंदोलन करणार**

# अष्टविनायक गणेश मंडळाचे नेत्र शिबिर, १५० रुग्णांची नेत्र तपासणी

**धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील तांदळवाडी येथील अष्टविनायक गणेश मंडळाकडून विविध सामाजिक उपक्रम घेऊन गणेशोत्सव साजरा केला जात आहे. गावातील एकजुटीचा संदेश देत एक गाव एक गणपती स्थापना करून गणेश उत्सव साजरा होत आहे. यात लोक उपयोगी रक्तदान शिबिर नेत्र तपासणी,स्वच्छता अभियान असे विविध सामाजिक उपक्रम घेऊन गणेश उत्सव साजरा करत आहेत



या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

धारूर तालुक्यातील तांदळवाडी येथे एक गाव एक गणपती ची स्थापना करून सामाजिक ऐक्याचा संदेश दिला आहे. गावांमधील ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीमध्ये राजकीय पार्श्वभूमी तसेच निवडणुकीतील गट तट बाजूला ठेवून गावात एकच गणेशाची स्थापना पान ३ वर

# पिवळी ज्वारी शरिरासाठी आरोग्यदायक

**सारणी । प्रतिनिधी**

खरीप आणि रब्बीला पेरली जाणारी पिवळ्या ज्वारीच्या बिया , ज्याला ज्वारी, चोलम, जोना आणि जोला देखील म्हणतात , हे सर्वात महत्वाचे अन्नधान्यांपैकी एक आहे. अनेक आरोग्य फायद्यांनी युक्त, हे अन्नधान्य जीवनसत्त्वे, मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम, कॅल्शियम, लोह, प्रथिने, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्समध्ये समृद्ध आहे. या धान्यांचा आहारात समावेश करून, लोक, विशेषत: ग्लूटेन ऍलर्जी किंवा सेलिआक रोग



असलेले, त्यांचे पचन सुधारू शकतात, हाडे मजबूत करू शकतात, लाल रक्तपेशींच्या विकासास प्रोत्साहन देऊ शकतात, मधुमेह नियंत्रित करू शकतात, रोगप्रतिकारक शक्ती वाढवू शकतात पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्याच्या पहिल्या 'वंदे भारत'चे सोमवारी लोकार्पण; पुणे-कोल्हापूर-हुबळी प्रवास होणार सोयीस्कर

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्याला मिळालेल्या पहिल्या वंदे-भारत एक्स्प्रेसचे लोकार्पण सोमवारी (दि.१६) होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हर्च्युअल पद्धतीने हे उद्घाटन होणार आहे. यावेळी पुणे-हुबळी या वंदे-भारत एक्स्प्रेसला केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ हे पुणे स्थानकावरुन झेंडा दाखवणार आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून पुणेकरांना प्रतिक्षित असणारी तसेच पुण्याहून सुटणाऱ्या पहिल्या वंदे भारत एक्स्प्रेसमुळे सातारा, मिरज, सांगली आणि कोल्हापूरमधील रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.



गणेशोत्सवाच्या निमित्ताने मोदी सरकारकडून महाराष्ट्राला ३ नव्या वंदे भारत एक्स्प्रेस मिळाल्या आहेत. यामध्ये पुणे-हुबळी, नागपूर-सिकंदराबाद आणि कोल्हापूर-पुणे आदी मार्गाचा समावेश आहे. या तिन्ही वंदे भारतचे लोकार्पण पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

पहिल्या वंदे भारत एक्स्प्रेसबद्दल माहिती देताना मोहोळ म्हणाले, 'पुण्याला पहिली वंदे भारत एक्स्प्रेस मिळाली, ही पुणेकर प्रवाशांसाठी निश्चितच आनंदाची बाब आहे. केवळ पुणेच नाही तर या एक्स्प्रेसचा फायदा पश्चिम महाराष्ट्राच्या संपूर्ण पटट्यासाठी होणार आहे. पुणे, सातारा, मिरज, सांगली आणि कोल्हापूर या भागात दळणवळण भक्कम होण्यास हातभार लागणार आहे. शिवाय यामुळे अर्थकारणालाही गती मिळणार आहे अशा भावना मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केल्या आहेत. पुढे ते म्हणाले, मोदी सरकार महाराष्ट्राच्या विकासासाठी कटिबद्ध असून महाराष्ट्रात आताच्या घडीला रेल्वे मंत्रालयाच्या मार्फत ८१ हजार ५८० कोटी रुपयांची विकासकामे सुरु आहेत. शिवाय यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पातून रेल्वेसाठी महाराष्ट्राला १५ हजार ९४० कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. यात १३२ रेल्वे स्थानक जागतिक दर्जाची करण्यात येत असून एकूण ८ वंदे भारत एक्स्प्रेस महाराष्ट्रात धावत आहेत, असेही केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले.

# पेट्रोलियम, रेल्वे बोर्ड संघ अंतिम फेरीत पुन्हा आमनेसामने

**पुणे । प्रतिनिधी**

गतविजेते पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड (पीएसपीबी) आणि गतवर्षीचे ( झींपश ) उपविजेते रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड (आरएसपीबी) संघांनी हॉकी महाराष्ट्र आयोजित चौथ्या हॉकी इंडिया पुरुष आंतर-विभाग राष्ट्रीय स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. सलग दुसर्या वर्षी दोन्ही संघ जेतेपदासाठी झुंजतील.



चिंचवड महानगरपालिकेच्या सहकार्याने मेजर ध्यानचंद स्टेडियम, नेहरूनगर-पिंपरी येथे सुरू असलेल्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत शनिवारी दोन्ही संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर पिछाडीवरून विजय मिळवले.

उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघाने सर्व्हिसेस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्ड (एसएससी) संघाचा ५-३ असा पराभव केला. त्यात गुरजिंदर सिंगचे दोन गोल मोलाचे ठरले. गतविजेत्यांनी दोन गोलच्या फरकाने विजय मिळवला तरी सुरुवातीला ते पिछाडीवर होते. २१व्या मिनिटाला अजिंक्य जाधवने मैदानी गोल करताना सर्व्हिसेसला आघाडीवर नेले. मात्र, सात मिनिटांच्या फरकाने गुरजिंदर सिंगने (२८वे-पीएस) पेनल्टी स्ट्रोकद्वारे पेट्रोलियम बोर्डाला बरोबरी साधून दिली. त्यामुळे मध्यंतराला १-१ अशी बरोबरी ( झींपश ) होती. उत्तरार्धात ६ गोलांची भर पडली. त्यात पेट्रोलियम बोर्डाने ४ गोल करताना आघाडी घेतली. त्यात युसुफ अफान (४९वे), तलविंदर सिंग (५०वे-पीसी), गुरजिंदर सिंग (५५वे-पीसी) आणि अरमान कुरेशी (५७वे) यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. सर्व्हिसेसकडून पवन राजभर (५३वे) आणि सुशील धनवरने (५८वे-पीएस) गोल करताना फरक कमी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांचे प्रयत्न तोकडे पडले.दिवसातील दुसर्या सामन्यात, रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघाने फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला (एफसीआय) २-१ असे रोखले. सामन्यातील तिन्ही गोल मैदानी होते. युवराज वाल्मिकी (४६वे), अतुल दीप याचा (५७वे) प्रत्येकी एक गोल आरएसपीबीच्या विजयात महत्त्वपूर्ण ठरला. पराभवाचा सामना करावा लागला तरी अंकुश याच्यामुळे (१२वे) एफसीआयने सुरुवातीला १-० अशी आघाडी घेतली होती. मध्यंतरापर्यंत आघाडी राखली तरी उत्तरार्धात शेवटच्या १४ मिनिटांमध्ये दोन गोल करताना रेल्वे स्पोर्ट्स बोर्डाने बाजी पलटवली.

# आठ मतदारसंघासाठी ४१ इच्छुक; शरद पवार गटाकडे विधानसभा उमेदवारांचे अर्ज दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यामध्ये लवकरच विधानसभा निवडणूका होणार आहे. त्यासाठी महाविकास आघाडीची जोरदार तयारी सुरु आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाने इच्छुकांचे अर्ज दाखल करुन घेण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये इच्छुकांची मोठी संख्या असल्याचे लक्षात आले आहे. केवळ आठ विधानसभा मतदारसंघासाठी एकूण ४१ इच्छुक उमेदवारांचे अर्ज दाखल झाले आहेत. यंदाची विधानसभा निवडणूक जोरदार रंगणार आहे. त्यासाठी शरद पवार गटाची जोरदार तयारी सुरु असल्याचे दिसून येत आहे. शरद पवार यांच्याकडे इच्छुकांची आणि पक्षांतर करणाऱ्या नेत्यांची रांग देखील मोठी आहे.

खडकवासला विधानसभा मतदारसंघातून सर्वांत जास्त नऊजण इच्छुक आहेत. पुणे शहरातील आठ विधानसभा मतदारसंघातुन पक्षाने इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविले होते. यामध्ये ४१ जणांनी अर्ज दाखल केले आहे. पक्षात खडकवासला



मतदारसंघातून सर्वांत जास्त इच्छूक असून, कसबा विधानसभा मतदारसंघातून केवळ एकच अर्ज दाखल झाला आहे. शहराध्यक्ष प्रशांत जगताप हे हडपसर विधानसभा मतदारसंघातून इच्छुक आहेत. त्यांच्यासह माजी उपमहापौर निलेश मगर, माजी नगरसेवक बंडू गायकवाड, योगेश ससाणे, प्रवीण तुपे हे इच्छूक आहेत. वडगाव शेरीमधून रेमश आढाव, सुरेश खांदवे, नतील गलांडे, अर्जुन चव्हाण, मेघा कुलकर्णी, भरमोय गलांडे, आशिष माने यांनी उमेदवारी मागितली आहे. शिवाजीनगर विधानसभा मतदार संघात उदय महाले, किशोर कांबळे, श्रीकांत पाटील, निलेश निकम, सुकेश पासलकर, औदुंबर खुने पाटील, अरुण शेलार, किसन गारगोटे यांनी अर्ज दाखल केले.

**'खडकवासला'तून सर्वाधिक अर्ज**

खडकवासला मतदारसंघात माजी नगरसेवक काका चव्हाण, सचिन दोडके, बाळाभाऊ धनकवडे यांच्यासह नऊ जणांची उमेदवारी मागितली आहे. पर्वती विधानसभा मतदारसंघात माजी नगरसेविका अश्विनी कदम, त्यांचे पती नितीन कदम, सचिन तावरे, फारुख शेख यांनी, कोथरुडमध्ये तीन तर कसबा विधानसभा मतदारसंघातून एक अर्ज दाखल झाला आहे. या सर्वांच्या मुलाखतीचा कार्यक्रम लवकरच जाहीर केला जाईल, अशी माहिती शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिली.

# पॅरालिम्पिक रौप्यपदक विजेता सचिन खिलारीचे पुण्यात जोरदार स्वागत; आझम स्पोर्ट्स अकादमीकडून जल्लोष; एक लाखाचा धनादेश सुपूर्द

**पुणे । प्रतिनिधी**

पॅरिस येथे नुकत्याच झालेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत एफ ४६ प्रकारात गोळाफेकमध्ये १६.३२ मीटरची गोळाफेक करून सचिन खिलारीने भारताला रौप्यपदक मिळवून दिले. त्या कामगिरीनंतर प्रथमच सचिन खिलारी पुण्यात आला होता. सचिन सराव करीत असलेल्या आझम स्पोर्ट्स अकादमीच्या वतीने यावेळी त्याची महात्मा गांधी रास्ता, कॅम्प ते आझम कॅम्पस अशी मिरवणूक काढली होती. मिरवणुकीनंतर झालेल्या कार्यक्रमात सचिनने उपस्थित असलेल्या युवा खेळाडूंशी संवाद साधला.



यावेळी महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. पी. ए. इनामदार, उपाध्यक्षा आबेदा इनामदार, सदस्य एस ए इनामदार, सचिनचे प्रशिक्षक अरविंद चव्हाण, आझम स्पोर्टस अकादमीचे संचालक डॉ. गुलजार शेख आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी सचिन खिलारीला आझम स्पोर्ट्स अकादमीच्या वतीने एक लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला.

यावेळी बोलताना सचिन म्हणाला, वातावरणाशी जुळून घेता यावे यासाठी आम्ही स्पर्धेच्या ठिकाणी दाखल झालो होतो. स्पर्धेच्या एक दिवस आधी आम्ही मैदानावर गेलो होतो, त्यावेळी तेथील प्रेक्षकांकडून मिळणारा प्रतिसाद नक्कीच आम्हाला प्रेरणा देणारा होता. याच प्रेरणेमुळे रौप्यपदक मिळविण्यात यशस्वी झालो.

स्पर्धेपूर्वी सराव करण्यासाठी आम्हाला जर्मनीला पाठविण्यात येणार होते, मात्र मी आझम स्पोर्ट्स अकादमीमध्येच सराव करण्याचे निश्चित केले होते. डॉ. इनामदार सर यांनी उभे करून दिलेल्या शेडमध्येच मी सराव केला. याच गोष्टीचा मला मोठा फायदा झाला. पावसामुळे सर्वांचे सराव बंद होते, मात्र मी एकटा शेडमध्ये सराव करत होतो, असे सचिन खिलारीने बोलताना सांगितले. डॉ. पी. ए. इनामदार म्हणाले, भारतीय महिला संघात खेळणारी किरण नवगिरे आणि पॅरालिम्पिक रौप्यपदक विजेता सचिन खिलारी या दोन्ही खेळाडूंना आवश्यक असलेल्या सोइसुविधा आम्ही उपलब्ध करून दिल्या. याचा फायदा त्यांना मोठ्या प्रमाणात झाला आहे. या दोन्ही खेळाडूंनी आझम कॅम्पसचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेले असून यांच्याकडून युवा खेळाडूंना नक्कीच प्रेरणा मिळेल, असा मला विश्वास आहे.

# देखाव्यांवरील खर्च टाळून कीर्तन महोत्सव

पुणे देखावे, विद्युत रोषणाई, ध्वनिक्षेपकावरील कर्कश गाणी, लेझर बीम आदींवर होणारा खर्च टाळून भवानी पेठेतील नवकिरण तरुण मंडळाने गणेशोत्सवात सलग दहा दिवस कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले आहे. राज्याच्या विविध भागांतील कीर्तनकारांचा त्यात समावेश आहे. महिला आणि बाल कीर्तनकारांनीही या महोत्सवात आमंत्रित करण्यात आले. महोत्सवाला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

भवानी पेठेत रामोशी गेटजवळ नवकिरण तरुण मित्रमंडळाने हा अभिनव उपक्रम राबविला. मंडळाचे हे १०८ वे वर्ष आहे. यापूर्वी मंडळ हलते, जिवंत देखावे सादर करीत. परंतु, नव्या पिढीवर आध्यात्मिक संस्कार करण्यासाठी मंडळाने गेल्यावर्षीपासून बदल करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार यंदा समाजप्रबोधन करण्यासाठी अखंड हरिनाम सप्ताह, कीर्तन महोत्सव कार्यक्रम सुरू केला आहे. त्यात पाच वर्षापासून ते ७० वर्षापर्यंतच्या नागरिकांनी सहभाग घेतला आहे. तसेच, मंडळातर्फे दररोज सुमारे दहा हजार भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्याता आले. गणेशोत्सवाला विधायक स्वरूप देण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष सनी कदम, सचिव ओंकार कांबळे, उपाध्यक्ष शुभम जगदाळे, खजिनदार अभिजित घोणे, शुभम वल्लाकट्टी आदींनी पुढाकार घेतला.

यंदा दहा दिवसांत काकड भजन, आरती, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या जीवन चरित्रावर हरिपाठ तसेच, कीर्तन घेण्यात येते. त्यात संत तुकाराम महाराज यांचे दहावे वंशज मुकुंद महाराज मोरे, चैतन्य महाराज राऊत, माऊली महाराज पठाडे, नवनाथ महाराज लिमण, शिवलीला पाटील, शालिनी देशमुख (इंदुरीकर), रोहिणी परांजपे, आकुर महाराज साखरे, संग्राम बापू महाराज भंडारे, सिद्धेश्वर महाराज गाढवे, भारुडकार जगन्नाथ महाराज खरात, पांडुरंग महाराज चांदर, नागेश महाराज पवार, बाळकृष्ण महाराज गाडे यांचे दररोज कीर्तन होत आहे.

## जमिनीच्या वादातून उद्योजकाचा तरूणांवर गोळीबार

**हवेली । प्रतिनिधी**

रिंगरोड जमिनीच्या व्यवहारातील पैशांच्या वादातून दोन जणांवर एका उद्योजकाकडून गोळीबार केल्याची घटना (शनिवार) सकाळी घडली आहे, जखमींवर लोणी काळभोर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. ही घटना कोरेगाव मुळ (ता.हवेली) येथील इमानदार वस्ती येथे घडली आहे.

हवेली तालुक्यांतील ग्रामीण पोलीस दलातील ऊरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोरेगाव मुळ हद्दीतील इमानदार वस्ती येथील एका बड्या उद्योजकाच्या घरात रिंगरोडच्या जमिनीमध्ये गुंतवणूक केलेले पैसे मागण्यासाठी दोन तरुण गेले होते. त्यावेळी त्यांच्यात वाद होऊन त्याचे पर्यावसान गोळीबारात झाले. या वादात उद्योजकाने आपल्या पिस्तुलातून दोन राऊंड फायर केले असुन, पायावर व पाठीवर गोळी लागल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. जखमींना लोणी काळभोर येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. ऊरुळी कांचन पोलीस घटनास्थळी दाखल झाले असुन, संशयीत आरोपीचा शोध पोलीस घेत आहेत, तर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे.

# ऑटो रिक्षा मंडळाकडून नोंदणीचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

स्थापना केली आहे. या मंडळामार्फत ऑटो रिक्षा आणि मीटर्ड टॅक्सी चालकांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात येणार असून संबंधितांनी या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाने केले आहे.

मंडळामार्फत जीवनविमा व अपंगत्व विमा योजना, आरोग्यविषयक लाभ, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास अर्थसाहाय्य, पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, कामगार कौशल्य वृद्धी योजना, ६५ वर्षावरील ऑटो रिक्षा व मीटर्ड टॅक्सी परवानाधारकांना निवृती सन्मान योजनेअंतर्गत सानुग्रह अनुदान, नवीन ऑटो रिक्षा, मीटर्ड टॅक्सी खरेदी, गृह खरेदीसाठी कर्ज आदी योजना राबविण्यात येणार आहेत.

या योजनेंतर्गत नोंदणी प्रक्रिया परिवहन विभागामार्फत राबविण्यात येणार आहे. मंडळाच्या सभासदत्वासाठी अर्जदाराकडे राज्यामध्ये नोंदणी असलेल्या ऑटो रिक्षा, मीटर्ड टॅक्सी अनुज्ञप्ती व बॅच असणे बंधनकारक राहील. नोंदणीकृत चालकांना मंडळाच्या जिल्हास्तरीय कार्यालयाकडून ओळखपत्र देण्यात येणार आहेत. चालकांनी योजनांच्या लाभासाठी अर्ज करणे आवश्यक राहील. सभासद नोंदणीकरिता ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येत असून, संबंधित प्रणालीवर ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## सावत्र पित्याकडूनच अल्पवयीन मुलीवर अत्याचार

बारामती । प्रतिनिधी

शहरात नात्याला काळीमा फासणारी घटना उघडकीस आली. सावत्र पित्याने अल्पवयीन मुलीशी जबरदस्तीने शारिरिक संबंध ठेवले. यातून मुलीला दिवस गेल्यानंतर ही गंभीर घटना उघडकीस आली.

या प्रकरणी अल्पवयीन मुलीच्या आईने शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पीडितेच्या आईशी आरोपीने दुसरा विवाह केला आहे. सध्या हे कुटुंब शहरात एकत्र राहते. मुलीची आई पहाटे उठून अंगण साफ करण्यासाठी जात होती. याचा फायदा घेत जुलै २०२४ पासून सावत्र बाप अल्पवयीन मुलीवर अत्याचार करत होता. जुलैपासून ते सप्टेंबरपर्यंत त्याने दोन-तीनदा तिच्याशी शारिरिक संबंध केले. त्यातून ही १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी गरोदर राहिली. याबाबत तू कोणाला काही सांगितले तर तुझ्या आईला व तुला जीवे मारून टाकीन. अशी धमकी तो पीडितेला देत होता. पोलीस निरीक्षक विलास नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संध्याराणी देशमुख या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# बँक दरोडा प्रकरणातील चार आरोपींना जन्मठेप, १० लाखांचा दंड ; शिवाजीनगर सत्र न्यायालयाचा निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

शिवाजीनगर सत्र न्यायालयाने दौंड तालुक्यातील यवत पोलीस ठाण्यांतर्गत ( झींपश)दाखल झालेल्या पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक दरोडा प्रकरणात चौघांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. या चार आरोपींना प्रत्येकी १० लाख रुपये दंडही सुनावण्यात आला आहे. दंड न भरल्यास प्रत्येकाला एक वर्षाची सक्तमजुरीची अतिरिक्त शिक्षा भोगावी लागेल. हा निर्णय विशेष मोक्का न्यायालयाचे न्यायाधीश पी. पी. जाधव यांनी दिला.

१० सप्टेंबर २०१६ रोजी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा राहू येथे मोठा दरोडा घालण्यात आला होता. रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्यांनी संगणमत करून बँकेवर हल्ला केला होता. या हल्ल्यात चोरट्यांनी बँकेचे सुरक्षा रक्षक दिपक कैलास भालेराव आणि त्याचे सहकारी उत्तम मारूती वाघ यांना चाकूचा धाक दाखवून बांधून ठेवले होते. चोरट्यांनी बँकेच्या इमारतीच्या मागील खिडकीचे लोखंडी ग्रिल गॅस कटरच्या सहाय्याने तोडले आणि तिजोरीतील ६५ लाख ५७ हजार रुपये चोरून नेले. यानंतर बँकेच्या व्यवस्थापकाने



यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

तपासादरम्यान पोलीसांनी अनेक पुरावे गोळा केले आणि आरोपींना पकडण्यात यश आले. न्यायालयीन प्रक्रियेमध्ये जवळपास आठ वर्षे तपास, पुरावे आणि साक्षीदारांच्या साक्षी नोंदवत आरोपींना दोषी ठरविण्यात आले. त्यातील एकाला निर्दोष सोडण्यात आले. तुषार शिवाजी सरडे असे निर्दोष मुक्तता झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

सचिन आप्पा उर्फ आप्पासाहेब उर्फ भाऊसाहेब इथापे उर्फ शिवाजी आप्पा पाटील (वय २८, रा. कोंडेगव्हाण, ता. श्रीगोंदा, अहमदनगर), समीर यशवंत ढगे (वय २७, रा. चांबुर्डी, ता. श्रीगोंदा, अहमदनगर), पतंग दत्तात्रय माने (वय २७), मारुती शिवाजी सरडे (वय ३०) या चौघांना जन्मठेप आणि प्रत्येकी १० लाख रुपये दंड दंड न भरल्यास एक वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा झाली आहे. सतीश आप्पा इथापे उर्फ सतीश आप्पा पाटील (वय ३०, रा. जळगाव), मंगल अप्पा इथापे (वय ४६), प्रियंका ज्ञानेश्वर उर्फ माऊली लोकरे उर्फ प्रियंका दीपक देशमुख यारोपींना सात वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी दहा लाख रुपये दंड. दंड न भरल्यास एक वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा झाली आहे. ज्ञानेश्वर उर्फ माऊली जगन्नाथ लोकरे, बबलू उर्फ बीसेट साळवे हे आरोपी फरार आहेत.

या गुन्ह्यातील आरोपींना पकडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर तपास करण्यात आला. संशयित आरोपींच्या घरांची झडती घेतल्यावर चोरीस गेलेल्या ६५ लाख ५७ हजार रुपयांपैकी ३ लाख १ हजार ७०६ रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली होते. याशिवाय, घरफोडीसाठी वापरलेली साधने गॅस कटर, गॅस सिलेंडर, पिस्टलच्या( झींपश) आकाराचे पत्रे, मास्क, रॅम्बो सुरा, स्टील तलवार आणि अन्य सामग्रीही पोलिसांनी जप्त केली होती.या प्रकरणाच्या तपासात यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांनी मोठे योगदान दिले. तपास अधिकारी निवृत्त पोलीस उप अधीक्षक राजेंद्र मोरे आणि पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तपास यंत्रणेने आरोपींना पकडण्यासाठी विशेष मोहीम राबवली होती. या प्रकरणात सरकारी वकील चंद्रकिरण साळवी यांनी आरोपींविरुद्ध ठोस पुरावे सादर केले. न्यायालयाने या सर्व पुराव्यांच्या आधारे आरोपींना दोषी ठरवले. फरार आरोपींचा शोध सुरू असून लवकरच त्यांना अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# काश्मीरमधील गणेशोत्सवाची मिरवणुकीने सांगता

**पुणे । प्रतिनिधी**

काश्मीर खोऱ्यात पाच दिवसांच्या सार्वजनिक गणेशोत्सवाची भव्य विसर्जन मिरवणुकीने बुधवारी सांगता झाली. या वेळी बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यात आला.



यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांसह इतरही अनेक उपक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये काश्मीरमधील स्थानिक नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

पुण्यातील मानाच्या सात गणपती मंडळांनी एकत्र येत त्यासाठी पाऊल टाकले आणि गतवर्षी काश्मीरमधील लाल चौकात दीड दिवसांचा गणेशोत्सव साजरा झाला. यामध्ये 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट'चे उत्सव प्रमुख आणि विश्वस्त पुनीत बालन यांनी पुढाकार घेतला.

यंदा कुपवाडा आणि अनंतनाग या आणखी दोन ठिकाणी पाच दिवसांचा गणेशोत्सव साजरा झाला. बुधवारी या दोन्ही ठिकाणच्या गणरायाचे भव्य अशा मिरवणुकीने विसर्जन करण्यात आले.

पहिली मिरवणूक गणपतीयार मंदिर ते हबा कडल येथील झेलम नदीपर्यंत आणि दुसरी मिरवणूक वेसू केपी कॉलनी ते संगम अनंतनागपर्यंत अशा ११ कि.मी. अंतरापर्यंत निघाली. या दोन्ही मिरवणुकांत स्थानिक संगीत वाद्यांसह स्थानिक काश्मीरी नागरिक मोठ्या भक्तिभावाने सहभागी झाले होते. काश्मीरमधील गणेशोत्सवातील वैशिष्ट्ये म्हणजे बाप्पाची होणारी पन्ना पूजा. ज्यामध्ये श्रीगणेशाला पोळीचा नैवद्य अर्पण केला जातो. ही पूजा म्हणजे एकता आणि सामुदायिक सौहार्दाचे प्रतीक मानले जाते.